www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118

दैनिक

# लोकरक्षणाय

प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

■ वर्ष - ०२ ■ अंक ९६ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरुवार, २२ ऑगस्ट २०२४ ■ रु. २/-

■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118








## मंगलदास बांदल यांना ईडीकडून अटक

### निवासस्थानी सापडले कोट्यवधींचे घबाड



● पुणे, अभिजीत येरल्लू :

विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्यात ईडी सक्रीय झाली आहे. पुणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती मंगलदास बांदल यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) अटक केली आहे. ईडीने मंगलदास बांदल यांच्या शिरुर आणि पुण्यातील निवासस्थानी छापेमारी केली. बांदल यांच्या निवासस्थानी कोट्यवधींची बेहिशेबी संपत्ती सापडली. या सर्व संपत्तीचे स्रोत ईडीकडून तपासले जात आहे, या चौकशीसाठी ईडीने मंगलदास बांदल यांना अटक केली आहे.

पुणे जिल्हा परिषदेचे माजी सभापती मंगलदास बांदल यांच्या शिरुर आणि पुणे येथील निवासस्थानी मंगळवारी धाड टाकली. त्यासोबतच शिक्रापूर आणि हडपसर येथील महंमदवाडी परिसरातील त्यांच्या निवासस्थानी मंगळवारी सकाळी सात पासून सर्च ऑपरेशन सुरु करण्यात आले. या कारवाईत ५ कोटी ६० लाख रोख रक्कम जप्त करण्यात आली आहे. त्यासोबतच बांदल यांच्याकडील पाच आलिशान कार, कोट्यवधी रुपयांची चार घड्याळे जप्त करण्यात आली आहेत. मंगलदास बांदल यांच्या शिक्रापूर येथील निवासस्थानी १६ तास सर्च ऑपरेशन करण्यात आले. यावेळी त्यांची पत्नी रेखा बांदल, दोन भाऊ आणि त्यांच्या कुटुंबियांचीही चौकशी करण्यात आली. मंगलदास बांदल हे पुण्यातील हडपसर येथील त्यांच्या निवासस्थानी होते. त्यांचीही ईडीने चौकशी केली. या कारवाईत कोट्यवधींचे घबाड ईडीने जप्त केले आहे. मंगलदास बांदल यांच्यावर शिवाजीराव भोसले बँकेच्या गैरव्यवहार प्रकरणी कारवाई करत अटक करण्यात आली.

नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीने शिरुर मधून मंगलदास बांदल यांना उमेदवारी जाहीर केली होती. मात्र त्यानंतर काही दिवसांतच झालेल्या भाजपच्या एका कार्यक्रमात मंगलदास बांदल उपस्थित होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित झालेल्या या कार्यक्रमाला बांदल उपस्थित असल्यामुळे वंचितवर प्रश्न उपस्थित करण्यात आले होते. त्यानंतर वंचित बहुजन आघाडीच्या निवडणूक समितीने बांदल यांची उमेदवारी रद्द केली होती.

## शेतकऱ्यांच्या खात्यावर २००० रुपये जमा?

### नमो किसान योजनेच्या चौथ्या हप्त्याचं वितरण

● मुंबई, यश सावंत :





शेतकऱ्यांसाठी एक दिलासादायक आणि महत्वाची बातमी आहे. नमो किसान योजनेच्या चौथ्या हप्त्याचं ऑनलाईन वितरण आज करण्यात आलं. केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांच्यासह मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार, कृषीमंत्री धनंजय मुंडे , आमदार पंकजा मुंडे यांच्या उपस्थितीत या हप्त्याचं वितरण करण्यात आलं.

केंद्र सरकार देशभरात पीएम किसान सन्मान निधी योजना राबवत आहे. या योजनेअंतर्गत शेतकरी कुटुंबाला दरवर्षी ६ हजार रुपये इतकी आर्थिक मदत दिली जाते. दर ४ महिन्यांच्या अंतरानं २ हजार रुपयांचा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केला जातो. अशाच प्रकारची योजना महाराष्ट्र सरकारनं देखील सुरु केली आहे. नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राज्य सरकारनं सुरु केली आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्य सरकार केंद्र सरकारच्या ६ हजार रुपयांमध्ये आणखी ६ हजार रुपयांची भर घालत आहे. त्यामुळं राज्यातील शेतकऱ्यांना प्रती वर्ष १२ हजार रुपये मिळणार आहेत..

### २५ ऑगस्टपर्यंत राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचं आयोजन

परळी वैद्यनाथ इथं आजपासून २५ ऑगस्टपर्यंत राज्यस्तरीय कृषी महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या मेळाव्यात शेतकऱ्यांना नमो किसान योजनेच्या चौथ्या हप्त्याचं ऑनलाईन वितरण करण्यात आलं आहे. परळी व बीड जिल्ह्याच्या इतिहासात राज्यस्तरीय कृषी महोत्सव पहिल्यांदाच होतो आहे. या महोत्सवाचे दिमाखदार सोहळ्यात मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन झालं.

## थोडक्यात

### उत्सवांत लेझर, डीजेला बंदी नाहीच; उच्च न्यायालयाकडून जनहित याचिका निकाली

● मुंबई, विशाल कारंडे :

सण-उत्सवांत मोठ्या प्रमाणात होणारे ध्वनिप्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांचे काटेकोर पालन करण्यात सरकारी यंत्रणा सकृतदर्शनी अपयशी ठरल्याचे पुरावे याचिकाकर्ते सादर करू शकलेले नाहीत. त्यामुळे या आदेशांच्या उल्लंघनाप्रकरणी चौकशीची मागणी केली जाऊ शकत नाही, असे नमूद करून सण-उत्सवांतील डीजे, प्रखर दिव्यांचा (लेझर बीम) वापर, त्यांची विक्री, ते भाडेतत्त्वावर देणे या सगळ्यांवर बंदी घालण्याची मागणी करणारी जनहित याचिका उच्च न्यायालयाने मंगळवारी फेटाळून लावली. पान २ वर

### दोघा साधकांच्या आत्महत्येचे गूढ वाढले; शोध मोहीम राबवून दरीतून मृतदेह काढले



● कोल्हापूर, नितीन देवळेकर :

आंबा घाट ( ता. शाहूवाडी ) येथे सड्यावरून दरीत उड्या मारून आत्महत्या केलेल्या दोघांचे मृतदेह रविवारी दुपारी काढण्यात आले. गूढ वाढवणाऱ्या या घटनेची नोंद साखरपा पोलीसात झाली आहे. स्वरूप दिनकर माने ( वय १९, रा, कवठे पिरान ) व सुशांत श्रीरंग सातवळेकर ( २१, निपाणी ) अशी त्यांची नावे आहेत. मठाधिपतीच्या निधनाने वैफल्यग्रस्त झाल्याने या दोन साधकांनी आत्महत्या केल्याची शक्यता वर्तवली आहे.

गोरंबे ( ता. कागल ) येथे एक मठ आहे. तेथील मठाधिपती महाराजांचे १५ दिवसापूर्वी निधन झाले. या मठात स्वरूप व सुशांत गेल्या अडीच वर्षांपासून साधक म्हणून राहत होते. महाराजांचे निधन झाल्यापासून ते तणावात होते. ९ ऑगष्टला सुशांतने घरी फोन करून मी पावस येथील मठात जात आहे असे सांगितले. परंतु तेथे न जाता या दोघांनी आंबा घाटातील सड्यावरून सुमारे १०० फूट खोल असलेल्या दरीत उडी मारली.

## राज्यातील सर्व आयटीआयसह मुंबई उपनगरमधील महाविद्यालयांमध्ये महिलांना स्व-सरंक्षणाचे प्रशिक्षण - पालकमंत्री मंगल प्रभात लोढा



● मुंबई, विशाल पाटील :

महिला व बालकांवर होणारे अत्याचार रोखण्यासाठी मुंबई उपनगरातील विविध शाळा महाविद्यालय आणि शासकीय वसतिगृह येथे महिलांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक संस्थानी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. राज्यातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्था व मुंबई उपनगरमधील प्रत्येक महाविद्यालयांमध्ये सप्टेंबर पासून स्व-सरंक्षणाचे प्रशिक्षण दिले जाणार आहे, अशी माहिती कौशल्य विकास मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी दिली. मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र राज्य गीताचा कोनशीला उद्घाटन समारंभ मंत्री श्री. लोढा यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी राजेंद्र क्षीरसागर, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) तेजस समेळ,जिल्हा नियोजन अधिकारी संजय शिंदे आदि उपस्थित होते. पान २ वर

## रास्त भाव दुकानदारांना कमिशन मोबदला वाढवून देण्यास सरकार सकारात्मक - अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ

● मुंबई, विशाल कारंडे :



राज्यात २०१७ नंतर रास्त भाव दुकानदारांचा मोबदला वाढवला नाही. वाढती महागाई आणि वाढता खर्च याचा विचार करता या दुकानदारांचा मोबदला वाढवून देण्यास सरकार सकारात्मक असून याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठपुरावा करून मंजूर करून घ्यावा, अशा सूचना अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी दिल्या. मंत्रालयातील परिषद सभागृहात या विषयावर मंत्री श्री. भुजबळ यांच्या अध्यक्षतखाली बैठक झाली. या बैठकीस वने व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, अन्न व नागरी पुरवठा विभागाचे प्रधान सचिव रणजितसिंह देओल यांच्यासह रास्त भाव दुकानदारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. रास्त भाव दुकानदारांना फक्त कमिशनवर अवलंबून राहून दुकान चालवणे कठीण होत आहे हे लक्षात घेता काही दिवसांपूर्वी रास्त भाव दुकानात स्टेशनरी आणि भाजीपाला विकण्यास परवानगी दिली आहे. राज्यातील ५६ हजार रास्त भाव दुकानदारांना यांचा फायदा होईल. तसेच सध्या केंद्रीय एन.आय. सी. संस्थेच्या सर्व्हर डाउन असल्यामुळे ई पॉस मशीनद्वारे अन्न धान्य वितरणामध्ये अडचणी येत आहेत. पान २ वर

## वरळी अपघात प्रकरण : मिहीर शहा आणि त्याच्या चालकाची अटक बेकायदा?

● मुंबई, यश सावंत :



वरळी येथील अपघाताप्रकरणी अटकेत असलेला मिहीर शहा (२३) आणि त्याचा चालक राजऋषी बिडावत यांच्या बेकायदेशीर अटकेच्या दाव्यावर आठवडाभरात भूमिका स्पष्ट करा, असे आदेश उच्च न्यायालयाने बुधवारी मुंबई पोलिसांना दिले. आपल्या आलिशान मोटरगाडीने ४५ वर्षीय महिलेला धडक देऊन तिच्या मृत्यूला कारणीभूत ठरल्याचा आरोप मिहीर याच्यावर आहे. मात्र, आपल्याला अटकेची कारणे सांगण्यात आली नव्हती. त्यामुळे, आपली अटक ही बेकायदा असल्याचा दावा करून मिहीर याने त्याची तातडीने जामिनावर सुटका करण्याच्या मागणीसाठी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. बिडावत यानेही मिहीर याच्याप्रमाणेच बेकायदा अटकेचा दावा करून सुटकेची मागणी केली आहे.

न्यायमूर्ती भारती डांगरे आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठापुढे मिहीर आणि बिडावत या दोघांची याचिका बुधवारी सुनावणीसाठी आली. त्यावेळी, या दोघांनी याचिकेद्वारे केलेल्या दाव्यांबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश न्यायालयाने पोलिसांना दिले. तसेच, प्रकरणाची सुनावणी २९ ऑगस्ट रोजी ठेवली.

दरम्यान, अटकेची कारणे देण्यात आली नसल्याच्या कारणास्तव काही प्रकरणांत आरोपींची अटक बेकायदेशीर ठरवण्यात आल्याच्या गेल्या काही महिन्यांतील निकालांचा मिहीर याने याचिकेत दाखला दिला आहे. तसेच, आपलीही अटक याच कारणास्तव बेकायदा ठरवून आपल्याला तातडीने जामिनावर सोडण्याचे आदेश देण्याची मागणी केली आहे. पान २ वर

## बदलापूरमधील दोन चिमुकल्यांवरील अत्याचारप्रकरणी २४ तारखेला मविआचा 'महाराष्ट्र बंद': नाना पटोले

● मुंबई, विशाल पाटील :



बदलापूरमध्ये दोन चिमुकल्यांवर झालेल्या अत्याचाराच्या घटनेने महाराष्ट्राच्या प्रतिमेला काळीमा फासला गेला आहे. बदलापूरमधील ज्या शाळेत अत्यंत गंभीर व मन सुन्न करणारी घटना घडली ती शाळा भाजपा आरएसएसशी संबंधीत आहे. या शाळेची बदनामी होऊ नये म्हणून प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे. शाळेतील सीसीटीव्ही फुटेज गायब आहे. या प्रकरणी महाभ्रष्ट युती सरकारविरोधात महाविकास आघाडीने २४ तारखेला महाराष्ट्र बंदची हाक दिली असून जनतेने मोठ्या संख्येने या बंदमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केले आहे. बदलापूरच्या अत्याचाराच्या घटनेने राज्यातील महिला मुलींच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. त्यामुळे आज महाविकास आघाडीच्या बैठकीत जागावाटपावर होणारी चर्चा रद्द करून राज्यातील महिलांवरील अत्याचाराच्या वाढत्या घटना आणि महिला सुरक्षेवर चर्चा करण्यात आली. या बैठकीला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, काँग्रेस कार्यसमितीचे सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खा. वर्षाताई गायकवाड, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री अनिल देशमुख, जितेंद्र आव्हाड, शिवसेना नेते खा. संजय राऊत, माजी मंत्री अस्लम शेख आदी उपस्थित होते.

पान २ वर

## बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेच्या पोलीस कोठडीत २६ ऑगस्टपर्यंत वाढ

● ठाणे, रोहित जैसवार :





बदलापूर पूर्व येथील एका नामांकित शाळेत दोन चिमुरड्यांवर झालेल्या लैंगिक अत्याचार प्रकरणातील प्रमुख आरोपी असलेल्या अक्षय शिंदे याला आज बुधवारी (ता. २१ ऑगस्ट) न्यायालयात हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने त्याच्या पोलीस कोठडीत २६ ऑगस्टपर्यंत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या नराधमाला आता 26 जन्माष्टमीपर्यंत पोलिसांच्या कोठडीत ठेवण्यात येणार आहे. या घटनेचे पडसाद संपूर्ण राज्यभर उमटले असून आरोपी अक्षय याला फक्त आणि फक्त फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी राज्यभरातून करण्यात येत आहे. बदलापुरातील घटनेमुळे सामान्य नागरिकांमध्ये आक्रोश पसरला आहे. त्यामुळे अशा घटनांमधी आरोपींना आता थेट फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी लावून धरण्यात आली आहे. तर या प्रकरणातील नराधम अक्षय शिंदे याला आज बुधवारी कल्याण न्यायालयात हजर करण्यात आले. ज्यानंतर सुनावणीवेळी न्यायालयाकडून महत्त्वाचे आदेश देण्यात आले. आरोपी अक्षय शिंदेला २६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. कल्याण न्यायालयातील न्यायाधीश वी. ए. पत्रावळे यांच्या दालनात ही सुनावणी पार पडली. यावेळी विशेष सरकारी वकील अश्विनी भामरे पाटील यांनी युक्तीवाद केला. ज्यावेळी आरोपी अक्षयला न्यायालयात आणण्यात आले. त्यावेळी पोलिसांचा मोठा फौजफाटा न्यायालय परिसरात तैनात करण्यात आला होता. काल आरोपीला फाशी द्या अशी मागणी बदलापूरकरांकडून केली जात होती. बदलापुरातील पालक आणि नागरिकांचा रोष पाहता आरोपीवर हल्ला होऊ शकतो, अशी शक्यता वर्तवण्यात येत होती. तर या प्रकरणी बदलापूरकरांनी मंगळवारी (ता. २० ऑगस्ट) केलेल्या आंदोलनामुळे आज या ठिकाणी तनावपूर्ण शांतता आहे. संपूर्ण बदलापुरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला असून या ठिकाणी नेट बंद ठेवण्यात आले आहे. बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदे हा २४ वर्षाचा असून त्याला सफाईसाठी नेमलेल्या कंपनीने या शाळेत कामावर ठेवले होते. हा नराधम ०१ ऑगस्टला शाळेत कामावर लागला होता. अक्षय शिंदे हा सफाई कर्मचारी होता. त्याने १२ तारखेला एका मुलीचा विनयभंग केला त्यानंतर त्याने ४ वर्षांच्या मुलीवर अत्याचार केले. पीडित मुलीने प्रायव्हेट पार्टमध्ये दुखत असल्याचे घरच्यांना सांगितले. पान २ वर

## उरण तालुक्यात हवा गुणवत्ता निर्देशांक १५० वर

● उरण, दिगंबर जाधव :



उरण तालुक्यात विविध ठिकाणी मंगळवारी पहाटे धुके पसरले होते. गेल्या काही दिवसांपासून धुकेसदृश वातावरण निर्माण झाल्याने पावसाने परतीचा मार्ग धरल्याची शंका व्यक्त केली जात आहे. तसेच पावसाने दडी मारल्यापासून उरणचा हवा गुणवत्ता निर्देशांक १५० वर पोहोचला. उरण परिसरात मागील पंधरा दिवसांपासून पावसाने दडी मारली आहे. त्यामुळे वातावरण तप्त झाले आहे. त्यातच मंगळवारी पहाटे वातावरणात धुके पसरले होते. तर दुसरीकडे पावसाने संपूर्ण आभाळ आच्छादले होते. या वातावरणामुळे उष्णता, धुके आणि पावसाचे वातावरण निर्माण झाले होते.

■ सप्टेंबर-ऑक्टोबर महिन्यांत हिवाळ्यात धुके निर्माण होते. मात्र ऑगस्ट महिन्यातच हे धुके पसरू लागले आहे. उरणच्या प्रदूषणात मागील दोन-तीन वर्षांपासून वाढ झाली आहे. हवेचा गुणवत्ता निर्देशांक देशात आणि जगात प्रथम क्रमांकावर जाऊन पोहोचला आहे. हवा गुणवत्ता निर्देशांक ३०० पार जाऊ लागला आहे. मागील दोन महिने चांगला पाऊस झाल्यामुळे हवा गुणवत्ता निर्देशांक सुधारला होता. मात्र मंगळवारी ६० वरून हा निर्देशांक १५० वर जाऊन पोहोचला आहे.

## संपादकीय

# बांगलादेशला सापडेल का, त्याची खरी ओळख ?

शेख हसीना यांच्या पलायनानंतर बांगलादेश हा पाकिस्तानसारखा धार्मिक वाटेवर जाईल का हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. धार्मिक ओळखीवर भर दिल्याने समाज किंवा देश एकजिनसी बनतात मात्र धर्मनिरपेक्ष राहिल्याने विविधता टिकून राहते व सामाजिक वीण अधिक घट्ट बसते.

२००९च्या ऑगस्ट महिन्याची गोष्ट आहे. मी अमेरिकेतील युनिव्हर्सिटी ऑफ ह्युस्टन क्लियरलेकला शिकत होतो. तिथे आम्हाला जेनेटिक्स हा विषय शिकवायला मूळ बांगलादेशचे पण तिथे स्थायिक झालेले प्रोफेसर होते. त्यांनी आम्हाला एक प्रश्न विचारला. 'जिने दोन देशांचे राष्ट्रगीते लिहिले आहे अशी व्यक्ती कोण?' त्यांनीच उत्तर दिलं, 'रवींद्रनाथ टागोर' मी विचारलं, 'पण प्रोफेसर, टागोर १९४१ या वर्षी वारले. आणि बांगलादेशचा जन्म तर १९७१चा ! मग टागोर हे भारतीय की बांगलादेशी यावर आमच्यात थोडी रस्सीखेच झालीच ! मात्र वर्ग संपल्यावर त्यांनी मला सांगितलं. 'आम्ही बांगलादेशींनी टागोरांना जेवढं महत्त्व दिलं तेवढं तुम्ही भारतीयांनी नाही दिलं.'

आज या घटनेला १५ वर्षे झाली. तेव्हा टागोरांना भारतीय या ओळखीत 'कैद' करून ठेवणारा मी आज मात्र राष्ट्रीयत्व या संकल्पनेच्या पलीकडे पाहतो आहे. मुळात आपली ओळख काय असावी? पण 'ओळख' ही संकल्पना विशेषतः भारतीय उपखंडासारख्या विविधतांनी व गुंतागुंतीने व्यापलेल्या प्रदेशाच्या पार्श्वभूमीवर एकजिनसी असू शकत नाही. बांगलादेशातील लोकांना त्यांच्या ५३ वर्षांच्या स्वतंत्र अस्तित्वाच्या प्रवासात आपली ओळख नेमकी काय आहे, असा प्रश्न कधी पडला असेल का ? 'बँकर टू द पूअर' या आपल्या आत्मकथनात मोहम्मद युनूस (ज्यांनी शेख हसीना यांच्या पलायनानंतर बांगलादेशच्या अंतरिम सरकारच्या प्रमुखपदी नुकतीच शपथ घेतली) यांनी त्यांच्या लहानपणीचा एक किस्सा सांगितला आहे. १९४७ या वर्षी त्यांच्याभोवती असलेले सर्व जण भारतापासून वेगळे होऊन स्वतंत्र पाकिस्तानची मागणी करीत होते. त्यांचा नुकताच बोलू लागलेला लहान भाऊ इब्राहिम हा त्यांच्या आवडीच्या पांढऱ्या रंगाच्या साखरेला 'जिना शुगर' म्हणत असे व नावडत्या तपकिरी चॉकलेटी साखरेला 'गांधी शुगर' आणि अर्थातच तिथल्या लोकांनी जिना यांच्या विचारसरणीची निवड केलीच! परंतु ही निवड पुढे २४ वर्षेच टिकू शकली. कारण 'धर्म' ही ओळख स्थापन करण्याचा आधार इतका तकलादू निघाला की लोकांनी अलिप्त होणे पसंत केले. मुख्य म्हणजे 'धर्म' हा स्वतंत्र ओळख स्थापन करण्याचा आधार असू शकत नाही या भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील विचारांना बळकटी प्राप्त झाली.

किंबहुना, 'धर्म' हा ओळखीचा आधार किती तकलादू होता हे पाकिस्तानकडे पाहून अगदी सहज पटण्यासारखे आहे. सांस्कृतिकदृष्ट्या विचार केला तर असं लक्षात येईल की भारतातील काश्मीर, पंजाब, राजस्थान व गुजरात या राज्यांतील सीमेपलीकडील भाग हा केवळ पाकिस्तान नसून अनुक्रमे काश्मिरी, पंजाबी, राजस्थानी व कच्छी हीच लोकं तिकडे राहतात. परंतु एकदा आपली ओळख एकजिनसी ठरवली की या सूक्ष्म ओळखी पुसून टाकल्या जातात व भिन्नता स्थापन होत नाही. देश म्हणून आपली ओळख इस्लाम आहे या साच्याबाहेर ते कधीही पडू शकणार नाहीत. आणि तोच त्यांच्या जगण्याचा संघर्ष सदैव टिकून असणार आहे. याच पार्श्वभूमीवर बांगलादेशकडे पाहणे रोचक ठरते. प्रश्न असा उपस्थित होतो की, बांगलादेशची नेमकी ओळख कशी परिभाषित करायची ? आज 'बांगलादेश' म्हणून जो भूभाग अस्तित्वात आहे तीच त्याची ओळख मानावी का? परंतु हे व्यावहारिकदृष्ट्या बरोबर नाही, कारण ज्या व्यक्ती अथवा सांस्कृतिक प्रतीक 'बांगला' म्हणून आपल्या समोर ठेवली जातील ते बांगलादेशाच्या भोवती असलेल्या भारतातील (विशेषतः पश्चिम बंगालशी) सामायिक करावीच लागतील. रवींद्रनाथ टागोर आणि काझी नजरूल इस्लाम हे जितके बांगलादेशचे आहेत तितकेच पश्चिम बंगालचेही (आणि त्यामुळे भारताचेही) आहेत. किंबहुना, जे रवींद्रनाथ टागोर रचित 'आमार शोनार बांगला' हे आज बांगलादेशचे राष्ट्रगीत आहे ते खरं तर त्यांनी १९०५ या वर्षी इंग्रजांनी केलेल्या बंगालच्या फाळणीच्या विरोधात लिहिले होते.



### आजची चित्रोळी

गुलमुसलेली फुलें दवानें
न्हाऊनि जेव्हां गेली !
तरतरून ती फुलली तेव्हां
सकाळ होती झाली !!

**मुकुंद कुलकर्णी, कन्नमवार नगर, विक्रोळी, मुंबई**

पान १ वरून...

### उत्सवांत लेझर, डीजेला बंदी नाहीच; उच्च...

सण आणि उत्सवांत मिरवणुकीसह इतर समारंभासाठी लेझर बीम, कर्णकर्कश डीजेचा सर्रास वापर करण्याला अखिल भारतीय ग्राहक पंचायतीने जनहित याचिकेद्वारे आव्हान दिले होते. तसेच, उत्सवांतील लेझर बीम आणि डीजेच्या वापरामुळे अनेकांची दृष्टी आणि श्रवण क्षमतेवर परिणाम झाला असून काहींना कायमची दृष्टी गमवावी लागली आहे. त्यामुळे, लेझर बीम आणि डिजेच्या वापरावर पूर्ण बंदीची मागणी केली होती.

लेझर बीमच्या नियमनासाठी अद्यापपर्यंत कोणतीही विशिष्ट कायदेशीर तरतूद नाही. त्यामुळे, सार्वजनिक ठिकाणी, सार्वजनिक मेळाव्यांत आणि कार्यक्रमांमध्ये लेझर बीमच्या वापरावरील नियमनासाठी तात्काळ उपाययोजना करण्याच्या मागणीकरिता राज्य सरकारच्या योग्य प्राधिकरणाकडे तपशीलवार निवेदन सादर करण्याची याचिकाकर्त्यांना मुभा आहे, असे मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या खंडपीठाने याचिका निकाली काढताना प्रामुख्याने स्पष्ट केले

### राज्यातील सर्व आयटीआयसह मुंबई...

मंत्री श्री.लोढा म्हणाले की, राज्यात महिला व बालकांवरील अत्याचाराच्या घटना रोखण्यासाठी शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ त्याचप्रमाणे शासकीय व खासगी आस्थापना यांनी सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून काटेकोरपणे उपाययोजना कराव्यात. शाळा व महाविद्यालयाने आणि विविध संस्थांनी आपल्याकडे नियुक्त केलेल्या कर्मचारी वर्गाची देखील खात्रीपूर्वक तपासणी करावी, कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी सर्वांनी खबरदारी घ्यावी अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या. तसेच शाळा व महाविद्यालयामधील शौचालयांच्या ठिकाणी जिथे महिला शौचालय आहेत तिथे महिलाच कर्मचारी नियुक्त करण्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे, असेही त्यांनी यावेळी सांगित

### रास्त भाव दुकानदारांना कमिशन मोबदला वाढवून...

त्यामुळे ऑफलाईन वितरण करण्यास परवानगी दिली आहे. जोपर्यंत अडचण दूर होत नाही तोपर्यंत ऑफलाईन वितरण सुरू राहील. तसेच ई-पॉस मशीनची समस्या तातडीने दूर करावी अशा सूचनाही त्यांनी दिल्या. मंत्री श्री. मुनगंटीवार म्हणाले की, रास्त भाव दुकानदारांना उत्पन्नाचा स्रोत निर्माण व्हावा यासाठी शासकीय जाहिराती या दुकानात लावाव्यात आणि त्याचे कमिशन द्यावे अशा प्रकारचा प्रस्ताव तयार करून तो मंत्रिमंडळ बैठकीत ठेवावा. यामुळे राज्यात सध्या असलेली ५६ हजार रास्त भाव दुकानदारांना त्याचा फायदा होईल. तसेच किमान महिन्याला १ कोटी ६० लाख पेक्षा जास्त लोकांपर्यंत पोहचता येणार आहे.

### वरळी अपघात प्रकरण : मिहीर शहा आणि त्याच्या...

कनिष्ठ न्यायालयाने आपल्याला सर्वप्रथम सुनावलेल्या पोलीस कोठडीचा आणि त्यानंतर देण्यात आलेल्या न्यायालयीन कोठडीचा आदेश रद्द करण्याची मागणीही मिहीरने केली आहे. त्याचप्रमाणे, आपली अटक बेकायदा असल्याने यापुढेही आपल्याला कोठडीत ठेवण्यात आल्यास ते घटनात्मक आदेशाचे तसेच, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ५० चे उल्लंघन ठरेल, असा दावा देखील मिहीर याने केला आहे. या कलमानुसार, पोलिसांनी आरोपीला अटकेची कारणे लेखी स्वरूपात सांगणे अनिवार्य आहे.

### बदलापूरमधील दोन चिमुकल्यांवरील...

बैठकीनंतर माध्यमांशी बोलताना बदलापूरच्या घटनेवर संताप व्यक्त करत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले की, भाजपा युती सरकारला सत्तेची गुर्मी चढली आहे. महिला अत्याचारांचे प्रमाण राज्यात प्रचंड वाढले आहे पण सरकार आपल्यात मस्तीत आहे. लाडकी बहिण म्हणून १५०० रुपये देण्यासाठी मोठ मोठे इव्हेंट केले जात आहेत पण बहिणींची सुरक्षा केली जात नाही. राज्य सरकार, गृहखाते, शासन आहे की नाही अशी परिस्थिती आहे. बदलापूरच्या घटनेत पोलीसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. तक्रार दाखल करण्यास गेलेल्या पीडित मुलीच्या आईला तासनसात पोलीस स्टेशनमध्ये बसवून ठेवण्यात आले. पोलीस कोणाच्या दबावाखाली काम करत आहेत, सरकार कोणाला वाचवण्याचा प्रयत्न करत आहे, असे पटोले म्हणाले. दोषीवर कठोर कारवाई करावी यासाठी बदलापूरमध्ये लोकांनी मोठे जनआंदोलन केले पण ते आंदोलनही दडपण्याचा प्रयत्न केला. राज्यात बाल अत्याचारांच्या घटनाही वाढल्या आहेत. भाजपा युती सरकार अत्यंत अकार्यक्षम, भ्रष्ट सरकार आहे या सरकारला जागे करण्यासाठी २४ तारखेला महाराष्ट्र बंद ची हाक दिली आहे. या बंदमध्ये मविआमधील सर्व घटक पक्ष सहभागी होणार आहेत. बदलापुरच्या पीडित कुटुंबाला न्याय देण्यासाठी डॉक्टर, वकील, पालक यांनीही या बंदमध्ये सहभागी होऊन सरकारच्या विरोधात आवाज बुलंद करावा असेही काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले..

### बदलापूर प्रकरणातील आरोपी अक्षय शिंदेच्या...

अक्षय शिंदेकडे मुलींना वॉशरुमला नेण्याची जबाबदारी होती. शाळेने स्वच्छतागृहांच्या साफ सफाईसाठी महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली नसल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे या आरोपीने याच गोष्टीचा फायदा घेतल्याचे समोर आले आहे. यानंतर पालकांनी तत्काळ पोलीस स्टेशन गाठले मात्र रात्री १२ वाजेपर्यंत पोलिसांनी पालकांना बसवून ठेवले. मनसेने याबाबत आवाज उठवायला सुरुवात केल्यानंतर पोलिसांनी तक्रार दाखल केली. यानंतरही पोलिसांनी पाहिजे तसा तपास केला नाही, असा आरोप केला जात आहे.

# मानवतेला काळीमा फासणारी घटना



कोलकात्यात एका डॉक्टर असलेल्या तरुण मुलीवर झालेल्या अत्याचाराने देशात संतापाची लाट उसळली असतानाच आपल्या महाराष्ट्रात त्याहून संतापजनक घटना घडली . बदलापूर शहरातील एका नामांकित शाळेत चार वर्षाच्या दोन मुलींवर शाळेतच अत्याचार झाला. मन सुन्न करणारी ही घटना समोर आल्यावर नागरिकांच्या संतापाचा कडेलोट झाला आणि यात दोषी असलेल्या नराधमाला फाशी द्यावी यासाठी नागरिक मैदानावर उतरून आंदोलन करू लागले. बदलापूरच्या घटनेने केवळ बदलापूर मध्येच नव्हे तर राज्यभर संतापाची लाट उसळली आहे. बदलापूरची घटना ही मानवतेला काळीमा फासणारी घटना आहे. मानवतेला काळीमा फासणाऱ्या या घटनेने राज्यात महिला तसेच मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. अर्थात महाराष्ट्रात घडलेली ही पहिली घृणास्पद घटना नाही मागील काही वर्षात तर अशा घटनांची मालिकाच सुरू आहे मागील वर्षीच पहाटे कामावरून घरी परतणाऱ्या एका संगणक अभियंता तरुणीवर रिक्षा चालकाने लैंगिक अत्याचार करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक घटना पुण्यातील वानवडी परिसरात घडली होती. त्याआधी मुंबईतील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील विद्यार्थिनीची सुरक्षा राक्षकाने हत्या केल्याची बातमी आली होती. मुंबईत छत्रपती शिवाजी टर्मिनसहुन वाशिकडे हार्बर रेल्वेने परीक्षेसाठी येणाऱ्या वीस वर्षीय तरुणीवर एका नाराधमाने मज्जीद बंदर जवळ धावत्या डब्यातच लैंगिक बळजबरी करण्याचा प्रयत्न केला होता. कोपर्डीची घटना तर अजूनही ताजीच आहे अर्थात वर उल्लेख केलेल्या घटना या फक्त प्रातिनिधिक आहेत अशा घटना आपल्या राज्यात दररोज घडत असतात. दररोजच्या वर्तमानपत्रात महिला अत्याचाराची एक तरी घटना वाचायला मिळतेच. घटना घडून गेल्यावर शासनाकडून घटनेच्या चौकशीचे आणि पोलिसांकडून आरोपींना कठोर शिक्षा करण्याचे आश्वासन दिले जाते अर्थात घटना घडून गेल्यानंतर आरोपींना पकडून शिक्षा देण्यापेक्षा महिला अत्याचाराच्या घटना घडूच नये यासाठी पोलिसांनी प्रयत्न करायला हवेत. बदलापुरात बारा तासांनी पोलिसांनी गुन्हा नोंदवला पोलिसांनी इतक्या संवेदनशील प्रकरणात इतकी असंवेदनशीलता दाखवणे निषेधार्हच आहे अर्थात पोलिसांनी असे करावे यासाठी पोलिसांवर कोणाचा दबाव होता का ? याचीही चौकशी व्हायला हवी. यात शाळा प्रशासनाची देखील मोठी चूक आहे. शाळा प्रशासनाने हे प्रकरण दाबण्याचाच प्रयत्न केल्याचे वरकरणी दिसत आहे. दिवसाढवळ्या महिलांची, मुलींची अब्रू लुटून त्यांची हत्या करण्याची नाराधमी प्रवृत्ती अलीकडे जोर धरू लागली आहे. दिवसाढवळ्या अशा प्रकारचे गुन्हे करण्याची हिंमत नराधमांमध्ये निर्माण होते याचाच अर्थ या नराधमांना कायद्याचा आणि राज्यातील सुरक्षा यंत्रणांचा धाक राहिला नाही. आपण कितीही मोठा गुन्हा केला तरी कायदा आपले काहीही करू शकत नाही. पैशाच्या जोरावर आपण कायदा आणि सुरक्षा यंत्रणांना आपण वाकवू शकतो अशीच धारणा या नराधमांची झाली आहे म्हणूनच ते असे मानवतेला काळिमा फासणारे कृत्य करत आहे. फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना शोभणीय नाहीत. पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणाऱ्या या घटना आहेत. महिलांकडे उपभोगी वस्तू म्हणून पाहण्याची पुरुषी मानसिकता वाढू लागली आहे हीच मानसिकता यामागे कारणीभूत आहे. आज राज्यातील कोणत्याच महिला सुरक्षित नाही मग ती तीन वर्षाची चिमुरडी असो की सत्तर वर्षाची आजी. शाळा, कॉलेज, कामाचे ठिकाण, सार्वजनिक वाहन, स्वतःचे घर इतकेच काय तर पोलीस स्टेशन देखील महिलांसाठी सुरक्षित नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल. महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यासाठी ही लाजिरवाणी बाब आहे. पूर्वी अशा घटनांसाठी बिहार आणि उत्तरप्रदेश ही राज्ये प्रसिद्ध होती आता त्यात महाराष्ट्राची भर पडते की काय अशी शंका येऊ लागली आहे. महाराष्ट्राचा बिहार, उत्तरप्रदेश होऊ नये यासाठी सरकारने आणि पोलीस दलाने महिला अत्याचाराच्या वाढत्या घटना रोखण्यासाठी ठोस उपाययोजना करायला हव्यात तसेच संबंधित गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या नराधमांना कठोरात कठोर शिक्षा द्यायला हवी तसे झाले तरच राज्यातील महिला अत्याचाराच्या घटनांना आळा बसेल आणि पुरोगामी महाराष्ट्र ही महाराष्ट्राची ओळख कायम राहील.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन

आपल्या आयुष्यात आपले आजी-आजोबा यांच्याप्रमाणेच अनेक ज्येष्ठ नागरिक असतात. अनेकदा आपण त्यांच्याकडे, त्यांच्या आरोग्याकडे, त्यांच्या बोलण्याकडे सहज दुर्लक्ष करतो. 1988 मध्ये, अध्य रोनाल्ड रेगन यांनी हीच समस्या लक्षात घेतली आणि ज्येष्ठ नागरिक आणि त्यांच्या जीवनमानावर परिणाम करणाऱ्या समस्यांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी हा दिन साजरा करण्याची घोषणा केली. दरवर्षी 21 ऑगस्ट हा दिवस "ज्येष्ठ नागरिक दिन" म्हणून संपूर्ण जगामध्ये साजरा केला जातो. वृद्धांवर परिणाम होणाऱ्या विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हा दिवस साजरा केला जातो. जसे की, त्यांच्या आरोग्याच्या समस्या, तरुण लोक, कुटुंबातील किंवा घराबाहेरून त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध समाजामध्ये जनजागृती केली जाते. 1991 मध्ये प्रथमच हा उत्सव साजरा करण्यात आला. युनायटेड स्टेट मध्ये राष्ट्रीय जेष्ठ नागरिक दिन मोठ्या उत्सवाने साजरा केला जातो. हा दिवस मानवी समाजातील वृद्ध लोकांच्या योगदानावर प्रकाश टाकण्यासाठी आणि त्यांचा सन्मान करण्याच्या उद्देशाने साजरा केला जातो.युनायटेड नेशन नमूद केल्याप्रमाणे वृद्ध लोकांची संख्या 2050 पर्यंत 1.5 अब्जपेक्षा जास्त होण्याचा अंदाज आहे. ही वाढ पूर्वी आशिया आणि दक्षिण पूर्व आशिया मध्ये ठळकपणे दिसून येईल. कमी विकसित राष्ट्रे 2050 पर्यंत या ग्रहावरील दोन तृतीयांश लोक वृद्ध लोकांचे आयोजन करेल व लोकसंख्येच्या वाढीचा व त्यांच्या सर्वांगीण कल्याण समर्थन देणारी एक मजबूत व्यवस्था अस्तित्वात असणे योग्य आहे.

जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनाचे मूळ 19 ऑगस्ट 1988 रोजी अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष रोनल्ड रिगन यांनी जाहीर केले होते. 5847 नावाची घोषणा अमेरिकेचे अध्यक्ष यांनी केले. यामध्ये अमेरिकेमधील असलेले कुटुंब, समुदाय आणि राष्ट्रातील वृद्ध लोकांच्या कामगिरीवर त्यांनी प्रकाश टाकला होता. युनायटेड स्टेट काँग्रेसने 138 क्रमांकाच्या हाऊस जॉइंट रेझोल्युशन पास केला. ज्यामध्ये रोनल्ड



प्रविण बागडे

रिगन यांनी दरवर्षी ऑगस्टचा तिसरा रविवार 'राष्ट्रीय जेष्ठ नागरिक दिन' म्हणून घोषित करण्याची परवानगी दिली. अनेक वृद्ध लोक त्यांच्या मुलाकडून अत्याचार होत असल्याची तक्रार करतात त्यांना त्यांच्या मुलांकडून त्रास होतो अनेक जण आपल्या वृद्ध आई-वडिलांना ओझे मानतात. काही लोक त्यांना वृद्धाश्रमात टाकतात आणि त्यांच्या मालमत्तेचे नुकसान करतात. वृद्धांचे अशा समस्येला तोंड देण्यासाठी दरवर्षी 21 ऑगस्ट हा दिवस ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून साजरा केला जातो. यादिवशी वृद्धांच्या समस्याकडे विशेष लक्ष दिले जाते.

आरोग्य बिघडणे आणि वृद्धांवरील अत्याचार यासारख्या वृद्ध व्यक्तींवर परिणाम करणारे घटक आणि समस्यांबद्दल जागरूकता वाढविणे हा या दिवसाचा उद्देश आहे. कायद्यानुसार भारताची नागरिक असलेली कोणतीही व्यक्ति (स्त्री किंवा पुरुष) ज्याचे वय साठ वर्षे किंवा त्यापेक्षा जास्त आहे ते "ज्येष्ठ नागरिक" मध्ये येतात. साधारणपणे असे मानले जाते की जो कोणी 60 किंवा 65 वया पर्यंत पोहोचतो तो ज्येष्ठ नागरिक बनतो. हे धोरण शहरी आणि ग्रामीण भागात राहणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित समस्या, "सर्वात वृद्ध वृद्ध" आणि वृद्ध महिलांच्या विशेष गरजा हाताळते. भारतीय संस्कृतीमध्ये ज्येष्ठ नागरिकांना आदराचे स्थान आहे. ज्येष्ठांच्या हिताची काळजी घेणे, हे राज्य सरकारही आपले सामाजिक कर्तव्य मानते. राज्यातील ज्येष्ठ नागरिकांसाठी वृद्धाश्रम सुरू करण्यात आले आहेत. या वृद्धाश्रमांमध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या आहार, वैद्यकीय उपचार आणि इतर गरजा पूर्ण केल्या जातात. आपल्या प्रियजनांचे संघर्ष जाणून घेऊन त्यांना पाठिंबा देण्यासाठी आणि मदत करण्यासाठी ज्येष्ठतेचे वय समजून घेणे खूप महत्वाचे आहे. नियमांनुसार किमान 60 वर्षे वयोगटातील पुरुष ज्येष्ठ नागरिक आणि किमान 58 वर्षे वयाच्या महिला ज्येष्ठ नागरिकांना मेल/एक्स्प्रेस/राजधानी/शताब्दी/ जनशताब्दी/दुरांतो गटाच्या सर्व वर्गांच्या भाड्यात सवलत दिली जाते. या करीता सवलतीचा घटक पुरुषांसाठी 40% आणि महिलांसाठी 50% आहे. गेल्या जनगणनेनुसार सुमारे 15 दशलक्ष वृद्ध एकटे राहतात आणि त्यापैकी तीन चतुर्थांश महिला आहेत. पारंपारिकपणे, भारतात, वृद्धांना नेहमीच आदराने वागवले जाते आणि कुटुंबात त्यांना एक प्रमुख स्थान दिले जाते. आज 'जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन' साजरा होत आहे, त्यानिमित्त ज्येष्ठ नागरिकांना हार्दिक शुभेच्छा !

# बदलापुरातील रेल रोको आंदोलनाची चौकशी केली जाणार, पालकमंत्री शंभूराज देसाई यांची माहिती

ठाणे : बदलापुरातील दोन लहान मुलींवर झालेल्या अत्याचाराच्या निषेधार्थ मंगळवारी बदलापूर रेल्वे स्थानकात तब्बल नऊ ते दहा तास रेल रोको आंदोलन करण्यात आले होते. यामध्ये पोलिसांवर दगडफेक देखील करण्यात आली होती. यातील सहभागी आंदोलकांचा कोणत्या राजकीय पक्षाशी संबंध आहे का हे तपासण्यात येणार आहे. पोलिसांनी केलेल्या व्हिडीओ रेकॉर्डिंगच्या आधारे याचा शोध घेण्यात येईल आणि त्यांचा कोणाकोणाशी संबंध आहे हे सर्व तत्थ्य लवकरच बाहेर येईल, अशी माहिती ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी बुधवारी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली. तसेच या प्रकरणात दिरंगाई केलेले पोलीस अधिकारी आणि शाळा प्रशासनातील शिक्षक, मुख्याध्यापक यांच्यावर कठोर कारवाई करण्यात आली असल्याचेही देसाई यांनी सांगितले. बदलापूर येथील आदर्श शाळेत झालेल्या दोन लहान मुलींवर झालेल्या अत्याचाऱ्याच्या विरुद्ध बदलापूर मध्ये मंगळवारी झालेल्या आंदोलनाला हिंसक वळण लागले आणि रेल्वे स्थानकात रेल रोको



करणाऱ्या आंदोलकांनी पोलिसांवर दगडफेक देखील केली. यासर्व प्रकरणानंतर आज जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी आज बदलापूरला भेट देत पोलीस अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेतली. यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी या प्रकरणातील आरोपीची पोलीस कोठडी वाढविण्यात आली असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच हा आरोपी खासगी कर्मचारी होता. शाळेने नियुक्त केलेला कर्मचारी नसल्याचे सांगत, कॉलेज, हॉस्टेल येथे खासगी कर्मचारी यांची नेमणूक करताना त्याचे पोलीस पडताळणी सादर करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तर शाळेचे सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध झाले नाहीत, हा शाळेचा हलगर्जीपणा आहे. यामुळे शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तातडीने यांचे निलंबन करण्यात आले आहे. तसेच हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात चालविला जाणार आहे. आयपीएस अधिकारी आर. पी. सिंग यांची एस आय. टी. प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात आली असून त्यांच्या देखरेखीखाली या सखोल चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहे. सर्व बाबी न्यायालयासमोर मांडण्यात येणार आहेत. या आरोपीने या अगोदर आणखी काही गुन्हे केले आहेत का याचा तपास चालू आहे असे सांगत आरोपीला शंभर टक्के फाशी होणार असे देखील पालकमंत्री देसाई यांनी सांगितले.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# चिमुकलींवर अत्याचार करणारा अक्षय शिंदे कोण?

## महिलांच्या शौचालयात त्याला परवानगी कशी?

**बदलापूर : बदलापूर लहान मुलींच्या लैंगिक शोषण प्रकरणी अक्षय शिंदे या २४ वर्षीय तरुणाला अटक करण्यात आली असून त्याला २६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. अवघ्या चार वर्षीय मुलींवर या नराधमाने अत्याचार केल्याने त्याच्यावर सर्वत्र टीका केली जातेय. एवढंच नव्हे तर या प्रकरणी गुन्हा दाखल होण्यास उशीर झाल्यानेही बदलापुरात काल (२० ऑगस्ट) आंदोलन पेटले होते. परिणामी लोकल सेवा जवळपास १० तास खंडित झाली होती.**



१३ ऑगस्ट रोजी या नराधमाने सकाळी ९ ते दुपारी १२ च्या दरम्यान बदलापुरातील आदर्श विद्यामंदिर या शाळेतील दोन लहान मुलींबरोबर दुष्कृत्य केलं. परिणामी त्यांना गुप्तांगात वेदना होऊ लागल्या. या मुलींनी यासंदर्भात त्यांच्या पालकांना कळवलं. पालकांनी तत्काळ वैद्यकीय तपासणी केल्याने हा प्रकार उजेडात आला. परंतु, वैद्यकीय अहवाल प्राप्त झाल्यानंतरही या प्रकरणी कारवाई करण्यास पोलिसांकडून दिरंगाई झाल्याचा दावा करण्यात येतोय. १३ ऑगस्ट घडलेल्या घटनेबाबत १६ ऑगस्टच्या रात्री गुन्हा नोंदवण्यात आला. तर १७ ऑगस्ट रोजी अक्षय शिंदे या आरोपीला अटक करण्यात आली. दरम्यान, आज सकाळी आरोपीला कडक पोलीस बंदोबस्तात कल्याण जिल्ह्यातील न्यायदंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले. न्यायाधीशांनी त्याला २६ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

दिलेल्या वृत्तानुसार २४ वर्षीय अक्षय शिंदे हा सफाई कामगार असून तो १ ऑगस्ट रोजी एका सफाई कंपनीमार्फत शाळेत कंत्राटावर नोकरीला लागला होता. नव्यानेच नोकरीला लागलेल्या अक्षयला विद्यार्थिनींना शौचालयास घेऊन जाण्याचीही जबाबदारी देण्यात आल्याचे वृत्त आहे. त्याचवेळी त्याने हा डाव साधत चिमुकल्यांवर अत्याचार केला.

रेल्वे पोलीस आयुक्त रवींद्र सिसवे म्हणाले की, रेल्वे सेवा रोखून धरणाऱ्या आंदोलकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच २६ लोकांना ताब्यात घेण्यात आले आहे. सीसीटीव्ही चित्रण तपासल्यानंतर आणखी काही लोकांना अटक करण्यात येईल आणि त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया पार पाडली जाईल, असे इंडियन एक्सप्रेसच्या वृत्तात म्हटले आहे.

### बदलापुरातील आंदोलन पूर्वनियोजित

"छापील फलक, व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपवरील मेसेज आणि इतर काही संकेतावरून हे आंदोलन पूर्वनियोजित असल्याचे समजते. लैंगिक अत्याचार प्रकरणात एफआयआर दाखल झाल्यानंतर सोमवारीच हे आंदोलन करण्याचा काही राजकीय पक्षांचा प्रयत्न होता. मात्र सोमवारी रक्षाबंधन असल्यामुळे आंदोलन मंगळावारी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, आंदोलकांकडे जे छापील फलक होते, तसेच इतर काही वस्तू आणल्या गेल्या होत्या. त्यावरून व्यवस्थित नियोजन करून हे आंदोलन केले गेले, हे दिसून येते. तसेच लाडकी बहीण योजनेच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली होती. त्यावरून हे आंदोलन राजकीयदृष्ट्या प्रेरित असल्याचे सांगितले जाते.

### कामावर ठेवताना कर्मचाऱ्याची तपासणी केली नाही

"मी शाळेला भेट दिली, या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा नाहीत. तसंच सखी सावित्री समितीही नाही. पुरुष स्वच्छता कर्मचाऱ्यांना महिला प्रसाधनगृहात जाऊ दिलं जातं आहे. जो आरोपी आहे तो कॉंट्रॅक्टवर लागला होता. मात्र त्याची पार्श्वभूमी काय हे कुणीही जाणून घेतलं नाही. त्याचं क्रिमिनल रेकॉर्ड आहे का ते पाहिलं गेलं नाही", असं महाराष्ट्र राज्य बालहक्क समितीच्या अध्यक्षा सुसीबेन शाह यांनी सांगितले.

# मला बदनाम करण्यासाठी राजकीय स्टंटबाजी, शिवसेना बदलापूर शहरप्रमुख वामन म्हात्रे यांचे स्पष्टीकरण



**बदलापूर :** मी संबंधित महिला पत्रकाराच्या बाबतीत कोणतेही अपशब्द काढलेले नाहीत. केवळ आणि केवळ मला बदनाम करण्यासाठी राजकीय स्टंटबाजी सुरु आहे. मी कोणत्याही प्रकारचे असे अपशब्द वापरलेले नाहीत. पोलिसांनी देखील याबाबत तपास करून निर्णय घ्यावा. माझ्या बाजूने देखील कायदेशीर पद्धतीने उत्तर देण्यात येईल. असे स्पष्टीकरण शिवसेनेचे शहरप्रमुख वामन म्हात्रे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिले आहे. तर उबाठा गटाकडून याचे राजकारण केले जात असल्याचा आरोप ही वामन म्हात्रे यांनी केला आहे.

बदलापूर येथील आदर्श शाळेत साडेतीन वर्षांच्या दोन चिमुकल्यांवर अत्याचार झाल्याची घटना समोर आली होती. याप्रकरणी सर्व बदलापूर वासियांनी मंगळवारी शहरभरात आंदोलन पुकारले होते. या घटनेचा सर्वत्र निषेध व्यक्त होत असताना पत्रकारांनीही हा विषय लावून धरला होता. याच कारणावरून बदलापूरचे माजी नगराध्यक्ष वामन म्हात्रे यांची एका महिला बातमीदारासोबत बोलताना जीभ घसरली होती. "तू अशा बातम्या देत आहेस, जणू तुझ्यावरच बलात्कार झाला आहे", अशा भाषेत म्हात्रे यांनी महिला बातमीदारावर आगपाखड केल्याचे आरोप केले जात होते. यावर वामन म्हात्रे यांनी आज पत्रकारांशी संवाद साधून याबाबत स्पष्टीकरण दिले आहे. मी संबंधित महिला पत्रकाराच्या बाबतीत कोणतेही अपशब्द काढलेले नाहीत. केवळ आणि केवळ मला बदनाम करण्यासाठी राजकीय स्टंटबाजी सुरु आहे. मी कोणत्याही प्रकारचे असे अपशब्द वापरलेले नाहीत. पोलिसांनी देखील याबाबत तपास करून निर्णय घ्यावा. माझ्याबाजूने देखील कायदेशीर पद्धतीने उत्तर देण्यात येईल, असे स्पष्टीकरण वामन म्हात्रे यांनी पत्रकारांशी संवाद साधताना दिले. मी सच्चा शिवसैनिक आहे.

# एसएसटी महाविद्यालयाचे अंबरनाथ युवा मॅरेथॉनमध्ये वर्चस्व



**कल्याण :** अंबरनाथ येथे आयोजित युवा मॅरेथॉन स्पर्धेत एसएसटी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत महाविद्यालयाचे नाव उंचावले आहे. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध गटांमध्ये अनेक पदके जिंकली.

पुरुष गटात १० किलोमीटरच्या धावणे स्पर्धेत रोहन चौधरीने प्रथम क्रमांक पटकावला. महिला गटात ८ किलोमीटरच्या धावणे स्पर्धेत सुजाता मुंडेकरने पहिले स्थान प्राप्त केले. याशिवाय, दिव्या गायकवाड, तृप्ती भोईर आणि रोशनी झुंगरे यांनी अनुक्रमे चतुर्थ, सहावा आणि सातवा क्रमांक मिळवला. १८ वर्षाखालील गटात, व्यंकटेश राठोडने द्वितीय क्रमांक मिळवला, तर मुलींच्या गटात पायल चव्हाणने द्वितीय क्रमांक प्राप्त केला. प्रणाली म्हात्रे आणि प्रतीक्षा काशीद यांनी अनुक्रमे सातवा आणि आठवा क्रमांक मिळवला. या स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल संपूर्ण एसएसटी महाविद्यालयाने त्यांचे अभिनंदन केले आहे. या विद्यार्थ्यांना क्रीडा संचालक प्रा राहूल अकुल आणि प्रा पुष्कर पवार यांनी मार्गदर्शन केले.

# रविंद्र घोडविंदे यांना समाजभूषण पुरस्कार



**कल्याण :** ज्येष्ठ शिक्षक, तज्ञ, पत्रकार आणि जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रवींद्र घोडविंदे यांना पर्यावरण बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने समाजभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. एका गरीब शेतकरी मुलापासून ते शिक्षण महर्षीपर्यंतचा प्रवास करत असताना त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. खडतर परिस्थितीवर मात करत डी.एड पर्यंतचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. शिक्षण घेण्यासाठी जे आपल्याला सोसावं लागलं ते इतर कोणालाही लागू नये म्हणून ग्रामीण भागात ज्या शिक्षणासाठी विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पालकांना जीवाच रान करावं लागत होतं त्याच परिसरात रवींद्र घोडविंदे यांनी 1990मध्ये 'जीवनदीप शैक्षणिक संस्था' नावाचं ज्ञानसंकुल उभारलं. या संस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गोवेली, खर्डी, म्हसा, टिटवाळा यांसारख्या ग्रामीण भागात महाविद्यालय उभारली.

# कचरा वेचून उपजीविका चालवणाऱ्या 'गुलाब'ची भाजपच्या शहर उपाध्यक्ष पदी निवड

**कल्याण :** कचरा वेचून कुटूंबाची उपजीविका चालविणाऱ्या गुलाब जगतापची कल्याण शहर भाजपच्या उपाध्यक्ष पदी निवड केल्याचे नियुक्ती पत्र माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने भाजपचे पदाधिकरी कार्यकर्ते उपस्थित होते.



गुलाब जगताप हे कल्याण पश्चिम भागातील साठे नगर झोपडपट्टीत कुटूंबासह राहून डंपिंगवर कचरा वेचण्याचे काम करतात. आईच्या पावलावर पाउल ठेवून त्यांनी हाच व्यसायाय निवडल्यांच ते सांगतात. माझी आई समाजकार्याचा एक भाग म्हणून शहरातील कचरा वेचून पोटाची खळगी भरत होती. गुलाब हे लहान वयात असतानाच (आरएसएस) संघाच्या जेष्ठ पदाधिकारी ललित सांरग, मधु फडके, माजी आमदार नरेंद्र पवार, अरुण देशपांडे, सुरेश पटवर्धन यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी सामाजिक व राजकीय जीवनात सुरुवात केल्याचे त्यांनी सांगितले.

दरम्यान, कल्याण भाजपचे शहर अध्यक्ष वरुण पाटील यांनी गुलाबचे तळागळातील लोकांसाठी सामाजिक कार्य व पुढाकार पाहून त्यांची निवड केल्याचे सांगितले. त्यांना नियुक्ती पत्र देताना भाजपचे जिल्हा अध्यक्ष नरेंद्र सूर्यवंशीसह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## थोडक्यात

### मराठी भाषेला बाजार मूल्य निर्माण होणे आवश्यक - प्रा. उदय रोटे


**कल्याण :** शाहू शिक्षण संस्था (पं) संचलित शहाड येथील मातोश्री वेलबाई देवजी हरिया कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन उल्हासनगर येथील आरकेटी महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक, मराठी लेखक प्रा. उदय रोटे यांच्या हस्ते व प्राचार्य डॉ. डी. एम. मुळे यांच्या उपस्थितीत मंगळवारी पार पडले. प्राचार्य डॉ. मुळे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले तर डॉ. अलका शिंदे यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. प्रा. रोटे यांनी आपल्या भाषणात मराठी भाषेला बाजार मूल्य निर्माण होणे आवश्यक आहे. पण आज तसे न होता आपला मराठी भाषक समाज सामाजिक असंवेदनशीलतेचे भरण पोषण करताना दिसतो अशी खंत व्यक्त केली.

### बदलापूरात घडलेली घटना मन सुन्न करणारी - अविनाश ओंबासे

**कल्याण :** बदलापूर शहरातील एका नामवंत शाळेतील लहान कोवळ्या मुलींवर अत्याचार करणारा शाळेतीलच सफाई कर्मचारी मग शाळा प्रशासन कोणासाठी आणि कशासाठी चालवतात शिक्षण संस्था? सरकार कोणतेही असो, यावर कडक शिक्षा कां होत नाही? गुन्हेगारांना त्वरीत पोलीस संरक्षण कां मिळते ? त्यांना त्वरीत फाशी किंवा जन्मठेप कां नाही? पिडीत व्यक्ती वा कुटुंबांची समाजात मात्र मानहानी वा तिरस्कार कां होतो? किंवा त्यांच्यावर दबाव, धमकी, अपमानास्पद जीवन जगण्याची वागणुक कोणामुळे मिळते? गुन्हेगार हा मात्र पोलीस संरक्षणात आरामात राहतो, आणि पिडीत/अन्यायग्रस्त मात्र समाजातील द्वेष, दबाव, निंदा, भयग्रस्त, टवाळीखोर, समाजकंटकांच्या वा राजकीय दबावाखाली आपले व आपल्या कुटुंबातील व्यक्तींसह आत्महत्या सारखे पाऊल कां उचलत आहे. ह्याचे खरे कारण वा जबाबदार कोण? कोणी सांगेल काय ? नाहीच ! कारण सर्वांनाच आपापल्या सोयीनुसार राजकारण करावयाचे असते.

# मोरबे धरण ९३ टक्के भरले

**नवी मुंबई :** नवी मुंबई शहरापेक्षा यंदा मोरबे धरण परिसरात अधिक पाऊस झाला असून मोरबे धरण ९३ टक्के भरले आहे. तर यंदाच्या पावसाळयात गेल्या वर्षीच्या तुलनेत अधिक पाऊस झाल्याने धरणाची पाणीपातळी झपाट्याने वाढली आहे. त्यामुळे यंदाही धरण १०० टक्के भरण्याची आशा नवी मुंबईकरांना आहे.



पावसाळ्यापूर्वी मोरबे धरणात कमी पाणीसाठा शिल्लक असल्याने पालिकेला ऐन उन्हाळयात विभागवार पाणीकपात करावी लागली होती. परंतु मागील काही दिवसांत झालेल्या दमदार पावसामुळे पाणीकपात रद्द करण्यात आली आहे.

काही दिवस पावसाने उघडीप दिली असली तर सोमवारपासून पुन्हा एकदा पावसाला सुरुवात झाली असल्याने लवकरात लवकर भरावे अशी आशा नागरिक बाळगून आहेत. यावर्षी सलग काही दिवस पाऊस झाला व जवळजवळ ६५० ते ७०० मि.मी. पाऊस झाला तर धरण १०० टक्के भरण्याची आशा आहे. १५ जूनपर्यंत मोरबे धरण परिसरात फक्त ७८.६० मि.मी एवढ्याच पावसाची नोंद झाली होती. त्यामुळे मोरबे धरणामध्ये फक्त २६ टक्के इतकाच कमी जलसाठा शिल्लक होता. त्यामुळे पालिका क्षेत्रामध्ये पाणीपुरवठा करताना संध्याकाळच्या पाणी पुरवठ्यात पालिकेने वाढीव कपात करण्यात आली होती. मोरबे धरण क्षेत्रामध्ये मंगळवार २० ऑगस्टपर्यंत एकूण ३००५ मिमी इतका पाऊस झाला आहे. यंदा गेल्या वर्षीच्या तुलनेत आजमितीला अधिक पाऊस होऊनही धरणात जलसाठा कमी आहे. पुढील काही दिवस चांगला पाऊस होण्याची शक्यता आहे. नवी मुंबई महापालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणात यंदा चांगला पाऊस झाला असून सलग ६०० ते ७०० मिमी पाऊस पडल्यास १०० टक्के धरण भरेल अशी आशा आहे.सध्या मोरबे धरण ९३ टक्क्यांपेक्षा अधिक भरले आहे.

# देवा ग्रुप संघटना मुरबाड तालुका अध्यक्ष यांचा वाढदिवस अवनी मतिमंद शाळेच्या विद्यार्थ्यांसोबत केला साजरा!



**मुरबाड** - देवा ग्रुप संघटना संपूर्ण महाराष्ट्र राज्यात असून सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय आसून देवा ग्रुप संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष सुजित ढोले यांच्या मार्गदर्शनावरून मुरबाड तालुका अध्यक्ष चेतन मोरे, यांच्या वाढदिवसाच्या निमित्त, जिल्हा परिषद शाळा कुंडाचीवाडी, विद्यानगर, डोंबेचिवाडी, सावळेवाडी, वाकळवाडी, येथे शैक्षणिक साहित्य वाटप करून व अवनी मतिमंद शाळा येथे, मतिमंद विध्यार्थ्यांना जेवण व खाऊ वाटप करून वाढदिवस साजरा केला,

देवा ग्रुप संघटना ही नेहमीच सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात अग्रेसर आहे,शैक्षणिक क्षेत्रात प्रत्येक विध्यार्थी हा पुढे गेला पाहिजे हाच आमचा ध्यास आहे, असे देवा ग्रुप संघटनेचे मुरबाड तालुका अध्यक्ष चेतन मोरे यांनी सांगितले.

# ..तर अशा क्रूरकर्म्या गुन्हेगारांना भर चौकात शिक्षा द्यायला पाहिजे! - खासदार सुरेश म्हात्रे

**वासिंद** - बदलापूर येथे घडलेली घटना अतिशय निंदनीय असून असे क्रुर लोक असतात त्यांना अजिबात माणुसकी नसते फक्त हैवानियत असते त्यामुळे अशा घटना घडू नयेत यासाठी कायद्यात बदल व्हायला पाहिजे व अशा क्रूरकर्म्या गुन्हेगारांना भर चौकात शिक्षा द्यायला पाहिजे असे स्पष्ट मत भिवंडी लोकसभा खासदार सुरेश (बाळया मामा) म्हात्रे यांनी येथे व्यक्त केले.




शहापूर तालुक्यातील असलेल्या प्रलंबित विकास कामांबाबत व नागरीकांच्या असणाऱ्या प्राथमिक समस्या सोडविण्यासाठी शासकीय विभागीय अधिकाऱ्यांची खासदार सुरेश म्हात्रे यांनी आयोजित केलेल्या आढावा बैठकीसाठी ते शहापुरात आले होते. तत्पूर्वी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सहकार्याने तथा माजी नगराध्यक्ष व विद्यमान नगरसेविका रजनी संतोष शिंदे यांच्या प्रयत्नाने शहापूर शहरातील वॉर्ड क्र. 15 व 17 मधील सावंत विहार, स्वामी समर्थ मार्ग व पठाणवाडा येथील 3 कोटी 40 लाख खर्चाचे कॉंक्रीट रस्ते व रोड लाईट या कामांचा लोकार्पण सोहळा खासदार सुरेश म्हात्रे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रसारमाध्यमांशी बोलताना त्यांनी आपले मत व्यक्त केले.

येथील कायद्यात बदल करून जसे सौदी मध्ये गुन्हेगारांना क्रूर शिक्षा दिली जाते त्याप्रमाणे अशा कृत्य करणाऱ्या गुन्हेगारांना भर चौकात शिक्षा द्यायला पाहिजे तर आणि तरच याचा परिणाम समाजावर होईल व पुढील घटना टाळता येतील अन्यथा पाच- दहा व वीस वर्षे कारागृहात गेल्यानंतर या घटना आपण विसरतो असे स्पष्टीकरण करून बदलापूर येथे घडलेल्या घटनेचा विषय लोकसभेत मांडणार असून याबाबत केंद्रीय गृहमंत्री यांना निवेदन देऊन अशा क्रूरकर्म्या गुन्हेगारांना कठोर शिक्षेची मागणी करणार असल्याचे सुरेश म्हात्रे यांनी म्हटले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला ठाणे-पालघर विभागीय अध्यक्षा विद्याताई वेखंडे, माजी आमदार पांडुरंग बरोरा, नगरसेविका रजनी शिंदे, सामाजिक कार्यकर्ते संतोषजी शिंदे, रा.कॉं. तालुकाध्यक्ष मनोज विशे, जेष्ठ कार्यकर्ते ज्ञानेश्वर तळपाडे, कृ.उ.बाजार समिती संचालक विनायक सापळे, माजी सरपंच गौतम गोडे, माजी सरपंच संजय भांगरे, साजिद शेख आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# मी अजूनही स्वप्निल कुसळेच!

मी ऑलिम्पिक पदक जिंकले म्हणजे खूप वेगळे असे काही केल्याचे मानत नाही. मी पूर्वीही स्वप्निल कुसळेच होतो आणि यापुढेही स्वप्निल कुसळेच राहणार, अशी विनयशील भावना भारताचा ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता नेमबाज स्वप्निल कुसळेने व्यक्त केली. कारकीर्दीत ऑलिम्पिक सुवर्णपदक हेच माझे ध्येय राहणार असून, त्यात काही फरक पडणार नाही. त्याचे दडपणही माझ्यावर नाही. उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी जे काही करायचे ते प्रयत्न मी करणार आहे.



''मला रायफल थ्री-पोझिशन प्रकारात सुवर्णपदक मिळवायचे आहे. त्यामुळे त्याच उद्देशाने सरावाला सुरुवात करणार आहे. चाहत्यांच्या नजरेतून मी आता प्रसिद्ध व्यक्ती झालो असलो, तरी मी तसे मानत नाही. माझी देहबोली पूर्वी होती तशीच आहे आणि माझी जीवनपद्धती देखील बदललेली नाही. मी तोच स्वप्निल आहे, जो ऑलिम्पिकपूर्वी होता'', असे कुसळे मुंबईत आयोजित कार्यक्रमादरम्यान म्हणाला. ''कारकीर्दीत ऑलिम्पिक सुवर्णपदक हेच माझे ध्येय राहणार असून, त्यात काही फरक पडणार नाही. त्याचे दडपणही माझ्यावर नाही. उद्दिष्टापर्यंत पोहोचण्यासाठी जे काही करायचे आहे ते प्रयत्न मी करणार आहे'', असेही स्वप्निलने सांगितले.

''एक भारतीय आणि साहजिकच महाराष्ट्रातून आल्याने ऑलिम्पिक पदक जिंकल्याचा मला अभिमान वाटतो. पदक जिंकले तेव्हा मी महाराष्ट्राचा कितवा पदकविजेता अशी कुठलीही भावना माझ्या मनात नव्हती. मी केवळ माझ्या कामगिरीवर लक्ष केंद्रित केले आणि देशासाठी सर्वोत्तम कामगिरी करण्याचा प्रयत्न केला'', असेही स्वप्निलने नमूद केले. ''माझ्या यशात माझे कुटुंबीय, तुम्ही चाहते आणि प्रशिक्षक, साहाय्यक प्रशिक्षकांचा मोठा वाटा असल्याचे मान्य केले. हे सर्व नसते, तर मी पदकापर्यंत पोहोचूच शकलो नसतो'', असे स्वप्निल म्हणाला.

ऑलिम्पिकपूर्वी स्पर्धा पार पडणाऱ्या शूटिंग रेंजवर सराव करण्याची संधी मिळाल्यामुळे मला लढतीच्या दिवशी रेंजवर जुळवून घेण्यास कठीण गेले नसल्याचेही स्वप्निल म्हणाला. स्वप्निलने या वेळी पुन्हा एकदा प्रशिक्षक दीपाली देशपांडे माझी दुसरी आईच असल्याचे सांगितले. त्यांनी माझ्याकडून खूप सराव करून घेतला. मी जेवढे त्यांचे ऐकत होतो, त्यापेक्षा त्या मला अधिक समजून घेत होत्या, अशा शब्दात त्यांनी प्रशिक्षक दीपाली देशपांडेंबद्दल आदर व्यक्त केला.

ऑलिम्पिक स्पर्धेदरम्यान त्याचा शांतपणा, संयम आणि त्याने धोनीवरील चित्रपटाची केलेली पारायणे यावरून स्वप्निल धोनीला आदर्श मानत असल्याची चर्चा होती. मात्र, मीच माझा आदर्श असे सांगून स्वप्निलने या चर्चेला पूर्णविराम दिला. ''मी ज्या परिस्थितीतून आलो आहे. ज्या प्रतिकूल परिस्थितीचा मी सामना केला हे मला माहीत आहे. त्यामुळे मीच माझा आदर्श आहे'', असे स्वप्निल म्हणाला. नेमबाजीसाठी आवश्यक असलेली मानसिक कणखरता माझ्यात निर्माण करण्यात कोल्हापूरच्या वैभव आगाशेंचा महत्त्वाचा वाटा असल्याचेही स्वप्निलने आवर्जून सांगितले.

मनूने पदक मिळवून चांगली सुरुवात करून दिली. त्यामुळे नंतर येणाऱ्या नेमबाजांमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. हे विसरता येणार नाही.

## 'प्रेमाची गोष्ट' फेम सावनीच्या घरी आली नवी पाहुणी! खरेदी केली नवीकोरी गाडी



'रात्रीस खेळ चाले' या मालिकेमुळे अभिनेत्री अपूर्वा नेमळेकर घराघरांत लोकप्रिय झाली. यामध्ये तिने साकारलेलं शेवंता हे पात्र प्रेक्षकांच्या आजही लक्षात आहे. सध्या अपूर्वा 'प्रेमाची गोष्ट' या मालिकेत सावनीची भूमिका साकारत आहे. हे पात्र खलनायिकेचं आहे. मुक्ता-सागरच्या संसारात दुरावा निर्माण करण्याचा सावनी पुरेपूर प्रयत्न करताना दिसते. अशा विविधांगी भूमिका साकारून प्रेक्षकांच्या मनात अपूर्वाने स्वत:चं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. अपूर्वा सोशल मीडियावर प्रचंड सक्रिय असते. तिचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. नुकतीच एक पोस्ट शेअर करत अभिनेत्रीने तिच्या चाहत्यांना आनंदाची बातमी दिली आहे. रक्षाबंधन व श्रावणी सोमवारचं औचित्य साधत अभिनेत्रीने नवीन गाडी खरेदी केली आहे.

गाडी खरेदी करताना अपूर्वाचं संपूर्ण कुटुंब उपस्थित होतं. यावेळी नव्या गाडीची अभिनेत्रीने आपल्या कुटुंबासह पूजा केली. याची खास झलक तिने सोशल मीडियावर शेअर करत पोस्ट देखील लिहिली आहे. अपूर्वा लिहिते, "रक्षाबंधन आणि तिसरा श्रावणी सोमवार या शुभमुहूर्तावर आम्ही ही नवीन गाडी खरेदी केली आहे. याक्षणी मी माझ्या भावाला अन् वडिलांना प्रचंड मिस करतेय अपूर्वा नवीन गाडी खरेदी केल्याचा व्हिडीओ शेअर करताच नेटकऱ्यांवर यावर कौतुकाचा वर्षाव केला आहे.

## "मी जिवंत आहे", अभिनेता श्रेयस तळपदेची पोस्ट



अभिनेता श्रेयस तळपदेला १५ डिसेंबर २०२३ रोजी हृदयविकाराचा झटका आला. उपचारानंतर तो बरा झाला आणि आता ठणठणीत आहे, पण तरीही त्याला पोस्ट करून तो हयात असल्याचं स्पष्टीकरण द्यावं लागलं आहे. श्रेयसने इन्स्टाग्रामवर यासंदर्भात पोस्ट शेअर केली आहे.

श्रेयसने लिहिलं, "मी जिवंत आहे, आनंदी आहे व निरोगी आहे हेच मी सर्वांना सांगू इच्छितो. माझ्या निधनाची माहिती देणाऱ्या एका व्हायरल पोस्टबद्दल मला कळालं. विनोद मी समजू शकतो, पण जेव्हा त्याचा गैरवापर केला जातो तेव्हा खरा त्रास होतो. एखाद्याच्या विनोदातून सुरू झालेली गोष्ट आता अनावश्यक काळजीचं निर्माण करत आहे, तसेच माझ्यासाठी काळजी करणाऱ्या लोकांच्या, खासकरून माझ्या कुटुंबाच्या भावनांशी खेळ होत आहे."

"माझी लहान मुलगी रोज शाळेत जाते, ती आधीच माझ्या आरोग्याबद्दल काळजीत आहे, ती सतत मला प्रश्न विचारत असते. या खोट्या बातमीमुळे तिची भीती आणखी वाढतेय. तिला तिच्या शाळेत याबद्दल शिक्षकांकडून, वर्गमित्रांकडून प्रश्न विचारण्यात येत आहेत. तिला आम्ही कुटुंब म्हणून सांभाळण्याचा प्रयत्न करतोय," असं श्रेयस म्हणाला. "अशा पोस्ट करणाऱ्या व फॉरवर्ड करणाऱ्यांनी हे थांबवावं आणि या पोस्टच्या होणाऱ्या परिणामांचा विचार करावा. बऱ्याच लोकांनी माझ्या आरोग्यासाठी मनापासून प्रार्थना केली आहे. लोकांच्या भावना दुखावण्यासाठी विनोदाचा वापर केला जातोय हे पाहून वाईट वाटतंय.

## प्रियांका चोप्राची मराठी प्रेक्षकांसाठी मोठी घोषणा

प्रियांका चोप्राने मराठी प्रेक्षकांसाठी मोठी घोषणा केली आहे. तिची निर्मिती असलेला 'पाणी' चित्रपट १८ ऑक्टोबर रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाद्वारे आदिनाथ कोठारे दिग्दर्शनात पदार्पण करत आहे. या चित्रपटाची निर्माती प्रियांका चोप्रा आहे. तिच्याबरोबरच राजश्री एंटरटेनमेंट व कोठारे व्हिजन प्रा. लि. हेही 'पाणी' चित्रपटाचे निर्माते आहेत. नितीन दीक्षित आणि आदिनाथ कोठारे यांची कथा असणाऱ्या 'पाणी'मध्ये आदिनाथ कोठारे, रुचा वैद्य, सुबोध भावे, रजित कपूर, किशोर कदम, नितीन दीक्षित, सचिन गोस्वामी, मोहनाबाई, श्रीपाद जोशी, विकास पांडुरंग पाटील अशी तगडी स्टारकास्ट आहे. नेहा बडजात्या, दिवंगत रजत बडजात्या, प्रियांका चोप्रा जोनस, डॉ. मधू चोप्रा या चित्रपटाचे निर्माते आहेत. तर महेश कोठारे, सिद्धार्थ चोप्रा या चित्रपटाचे सहयोगी निर्माते आहेत.




या चित्रपटाबद्दल पर्पल पेबल पिक्चर्सची संस्थापक प्रियांका चोप्रा जोनस म्हणाली, ""पाणी' हा चित्रपट जगभरातील प्रेक्षकांसाठी घेऊन येताना खूप आनंद होतोय. या चित्रपटात अतिशय महत्वाचा मुद्दा हाताळण्यात येणार आहे. हा चित्रपट खूप खास आहे. निर्मितीसाठी आव्हानात्मक असला तरी आपण ज्या काळात राहात आहोत, त्या काळासाठी तो खूप प्रासंगिक आहे. हा एका अशा माणसाचा प्रवास आहे, ज्याने आपल्या आजुबाजुच्या सर्वांच्याच जीवनात आमुलाग्र बदल घडवला. हा प्रवास सर्वांसाठीच प्रेरणादायी आहे."

"पर्पल पेबल पिक्चर्स नेहमीच अनोख्या, अविश्वसनीय आणि भारतातील प्रत्येक प्रदेशातील स्थानिक कथांना प्रोत्साहन देते. 'पाणी' हे मनोरंजन आणि प्रेरणादायी चित्रपटाचे ज्वलंत उदाहरण आहे. आदिनाथचे दिग्दर्शन खास आहे. या संपूर्ण टीमचे, त्यांच्या मेहनतीचे मनापासून आभार. माझा चौथा मराठी चित्रपट मी राजश्री एंटरटेनमेंट आणि कोठारे व्हिजन प्रायव्हेट लिमिटेड यांच्यासारख्या दोन बलशाली संस्थेसोबत घेऊन येत आहे. याचा मला आनंद आहे,'' असं प्रियांका म्हणाली. प्रियांकाने तिच्या इन्स्टाग्रामवर या चित्रपटाचा टीझर व्हिडीओ शेअर केला आहे. "तुमच्यासाठी एक खास बातमी! आमचा आगामी मराठी चित्रपट 'पाणी', १८ ऑक्टोबरला सर्व चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होत आहे. तर लवकरच भेटू.. चित्रपटगृहात," असं कॅप्शन प्रियांकाने व्हिडीओला दिलं आहे. " प्रियांका चोप्रा जोनस, राजश्री एंटरटेनमेंट यांच्यासोबत काम करण्याचा अनुभव म्हणजे माझ्यासाठी एक मोठी संधी होती. माझ्या दिग्दर्शनाच्या पदार्पणाच्या चित्रपटाला अशी टीम लाभणे, हे मी माझे भाग्य समजतो. 'पाणी' लवकरच तुमच्या जवळच्या सिनेमागृहात प्रदर्शित होईल आणि संपूर्ण टीमला विश्वास आहे की हा एक अनुभव असेल जो दीर्घकाळ प्रेक्षकांसोबत राहील," असं दिग्दर्शक आदिनाथ कोठारे म्हणाला.

## दिनविशेष

**घटना**

१९७२: वर्णद्वेषी धोरणाबद्दल झिम्बाब्वे ची आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीतुन हकालपट्टी करण्यात आली.
१९६२: फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष चार्ल्स द गॉल यांची हत्या करण्याचा कट फसला.
१९४४ : दुसरे महायुद्ध - सोविएत युनियनने रोमानिया जिंकले.
१९४२: दुसरे महायुद्ध - ब्राझीलने जर्मनी इटालीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९४१ : दुसरे महायुद्ध - जर्मन सैन्याने लेनिनग्राडला वेढा घातला.
१९०२ : कॅडिलॅक मोटर कंपनीची स्थापना.
१८४८: अमेरिकेने न्यू मेक्सिको हा प्रांत ताब्यात घेतला.
१६३९: ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी ने मद्रास (आताचे चेन्नई) शहराची सुरवात केली.

**जन्म**

१९६४: मॅट्स विलँडर - स्वीडीश टेनिस खेळाडू
१९५५ : चिरंजीवी अभिनेते आणि केंद्रीय मंत्री पद्म भूषण
१९३५: पंडित गोपीकृष्ण - कथ्थक नृत्यशैलीचे बनारस घराण्याचे नर्तक, नृत्यदिग्दर्शक व अभिनेते. (निधन: १८ फेब्रुवारी १९९४)
१९३४ : जॉन एनकोमो - झिम्बाब्वे देशाचे उपाध्यक्ष, राजकारणी (निधन: १७ जानेवारी २०१३)
१९२० : डेटन कुली - हृदयरोपण शस्त्रक्रियेचे जनक (निधन: १८ नोव्हेंबर २०१६)
१९१९ : गिरिजाकुमार माथूर हिंदी कवी (निधन: १० जानेवारी १९९४)
१९१८: बानू कोयाजी - कुटुंबनियोजनाच्या क्षेत्रात सलग साठ वर्षे कार्य करणाऱ्या - पद्म भूषण, रॅमन मॅगसेसे पुरस्कार (निधन: १५ जुलै २००४) १९१५ : जेम्स हिलियर - इलेक्ट्रॉन सूक्ष्मदर्शकाचे रचनाकार, कॅनेडियन-अमेरिकन संगणक शास्त्रज्ञ आणि शैक्षणिक ( निधन : १५ जानेवारी २००७)
१९१५ : शंभू मित्रा - बंगाली रंगभूमीवरील अभिनेते, दिग्दर्शक व नाटककार (निधन: १९ मे १९९७)
१९०४ : डेंग जियाओ पिंग सुधारणावादी चिनी नेते (निधन: १९ फेब्रुवारी १९९७)

**मृत्यू**

२०२२ : ए. जी. नाडियादवाला भारतीय चित्रपट निर्माते
२०२२ : आर. सोमशेखरन भारतीय गायक, संगीतकार
२०१४ : यू. ए. अनंतमूर्ती - भारतीय लेखक, कवी आणि नाटककार (जन्म: २१ डिसेंबर १९३२)
१९९९ : सूर्यकांत मांढरे मराठी चित्रपट रंगभूमीवरील अभिनेते
१९९५: पं. रामप्रसाद शर्मा संगीतकार, ट्रम्पेट व्हायोलिनवादक
१९८९: पं. कृष्णराव शंकर पंडित - ग्वाल्हेर घराण्याचे शास्त्रीय गायक (जन्म: २६ जुलै १८९३)
१९८९: अलेक्झांडर सर्गेयेविच याकोव्हलेव्ह - रशियन अभियंते, याकोव्हलेव्ह डिझाइन ब्यूरोचे संस्थापक (जन्म: १ एप्रिल १९०६)
१९८२: एकनाथ रानडे - क्रांतिकारक, स्वातंत्र्यसैनिक व कन्याकुमारी येथील विवेकानंद स्मारकाचे शिल्पकार (जन्म: १९ नोव्हेंबर १९१४)
१९८० : : किशोर साहू - चित्रपट अभिनेते, निर्माते आणि दिग्दर्शक (जन्म: २२ नोव्हेंबर १९१५)

## भारताविरुद्ध ग्रीन, मार्शने गोलंदाजीत अधिक जबाबदारी घेणे अपेक्षित – कमिन्स



**मेलबर्न :** या वर्षाच्या अखेरीस होणाऱ्या बॉर्डर-गावस्कर करंडक कसोटी मालिकेदरम्यान अष्टपैलू कॅमेरून ग्रीन व मिचेल मार्श यांनी गोलंदाजीत अधिक जबाबदारी घेणे अपेक्षित असल्याचे ऑस्ट्रेलियाचा कसोटी कर्णधार पॅट कमिन्स म्हणाला. नोव्हेंबरमध्ये भारत व ऑस्ट्रेलिया यांच्यातील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेला सुरुवात होणार आहे. ''संघात अष्टपैलू खेळाडू असल्याचा नेहमीच फायदा मिळतो. गेल्या काही वर्षांपासून आम्ही त्यांचा पुरेसा वापर केलेला नाही.

## तुम्हालाही बाटलीबंद कोल्ड कॉफी प्यायला आवडते का?

आपल्यातील अनेकांना कोल्ड कॉफी खूपच आवडते. हिवाळा असो किंवा उन्हाळा ही कोल्ड कॉफी पिण्याचा आनंद काही वेगळाच असतो. कोल्ड कॉफी बनवायला अतिशय सोपी आणि चवीला स्वादिष्ट असे पेय आहे. पण, बाटलीबंद कोल्ड कॉफी मानवी शरीरावर विपरीत परिणाम करू शकते का? तर त्यावर उपाय म्हणून दी इंडियन एक्स्प्रेसने के. जे. सोमय्या मेडिकल कॉलेज, हॉस्पिटल ॲण्ड रिसर्च सेंटरच्या पोषण व आहारशास्त्र विभागाच्या वरिष्ठ आहारतज्ज्ञ डॉक्टर मोनल वेलांगी यांच्याशी संवाद साधला.



डॉक्टर मोनल वेलांगी म्हणाल्या की, मार्केटमध्ये मिळणाऱ्या बंद बाटलीतील कोल्ड कॉफीमध्ये सरासरी १५ ग्रॅम प्रति १०० मिलिलिटर साखर असते. या साखरेमुळे रक्तातील ग्लुकोजच्या पातळीत वाढ होऊन इन्सुलिन वाढू शकते. बाटलीबंद कोल्ड कॉफी वारंवार प्यायल्याने रक्तातील इन्सुलिनची पातळी वारंवार वाढू शकते. यावर वेळीच उपचार न केल्यास, त्यामुळे रक्तातील साखर वाढून टाईप-२ मधुमेहाचा धोका वाढू शकतो, असे हेल्दी इंडियन प्रोजेक्ट (THIP) च्या पोषणतज्ज्ञ गरिमा देव वर्मन यांनी सांगितले आहे.

इन्सुलिन स्पाइक्स कमी करण्याचे सोपे उपाय :

१. शुगर फ्री कोल्ड कॉफी हा एक चांगला पर्याय आहे. कारण- मून एट अल. २०२१ च्या मेटा विश्लेषणाने सूचित केले आहे की, जास्त कॅफिन सेवनाने इन्सुलिन प्रतिरोध आणि संवेदनशीलतेवर लक्षणीय परिणाम झालेला नाही. कॅफिनच्या सेवनामुळे एपिनेफ्रिन संप्रेरक वाढते, ग्लुकोज, इन्सुलिन शरीरात सोडणे कमी होते, असे डॉक्टर मोनल वेलांगी म्हणाल्या आहेत.

२. पॅकबंद कोल्ड कॉफी पिण्यापूर्वी किंवा ऑर्डर करण्यापूर्वी एक वाटी सॅलड खा. कारण- सॅलडमधील फायबर इन्सुलिनची वाढ कमी करण्यास मदत करील, असे पोषणतज्ज्ञ गरिमा देव वर्मन यांनी सांगितले आहे.

## राशि भविष्य

**मेष** – रक्तदाबाचे रुग्ण त्यांचा रक्तदाब कमी करण्यासाठी आणि कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी रेड वाईनची मदत घेऊ शकतात. त्यातून त्यांना आराम लाभेल. धन तुमच्यासाठी गरजेचे आहे परंतु, धनला घेऊन इतके गंभीर होऊ नका की, आपल्या नात्यालाच खराब कराल.

**सिंह** – मित्रमैत्रिणींबरोबरची सायंकाळ सुखकारक आणि प्रसन्न असेल, पण अतिखाणे दुसऱ्या दिवशी त्रासदायक ठरू शकते. तुमचे काही जुने आजार आज तुम्हाला चिंतीत करू शकतात. ज्यामुळे तुम्हाला हॉस्पिटल ही जावे लागू शकते आणि तुमचे बरेच धन ही खर्च होऊ शकते.

**धनु** – तुमचा दुर्दम्य आत्मविश्वास आणि कामाची सुटसुटीत वेळ यामुळे आज दिवसभरात विश्रांती घेण्यास वेळ मिळेल. आज तुम्ही आपल्या घरातील सदस्याला कुठे फिरायला घेऊन जाऊ शकतात आणि तुमचे बरेच धन ही खर्च होऊ शकते. आपल्या कुटुंबियांबद्दल कायम आपुलकीने वागा, त्यांच्यासोबत प्रेमाचे आनंदाचे चार क्षण व्यतीत करा.

**वृषभ** – आजच्या दिवशी तुम्ही आराम करु शकाल. शरीराला तेलाने मसाज करुन तुमचे स्नायू मोकळे करा. जर तुम्ही आपल्या घरातील व्यक्तीकडून काही उधार घेतले असेल तर, आज त्यांना ते परत करा अथवा तुमच्या विरुद्ध ते कोर्टात कार्यवाही करू शकतात.

**कन्या** – तुमचे मनमोकळे आणि निडर विचार तुमच्या मित्राला तुमचा गर्व आहे असे वाटून तो दुखावला जाईल. अनपेक्षित स्रोतांद्वारे तुमची मिळकत होईल. कुटुंबातील सदस्यांच्या आनंदी स्वभावामुळे घरातील वातावरण उत्फूल्ल होईल. प्रवासामुळे प्रेमसंबंध प्रस्थापित होण्याची शक्यता आहे.

**मकर** – स्वत:बद्दल छान वाटावे अशा गोष्टी घडण्याचा एकदम अद्भूत दिवस. इतर दिवसांपेक्षा आजचा दिवस आर्थिक दृष्टीने चांगला राहील आणि तुम्हाला पर्याप्त धन प्राप्ती होईल. सुखद आणि अनोखी संध्याकाळ साजरी करण्यासाठी तुमच्या घरी नातेवाईकांची गर्दी होईल.

**मिथुन** – इतरांबरोबर आनंद वाटून घेण्याने आपले आरोग्य बहरून जाईल. जीवनाच्या गाडीला चांगल्या प्रकारे चालवण्याची इच्छा आहे तर, आज तुम्हाला पैश्याच्या बाबतीत विशेष काळजी घ्यावी लागेल. घरगुती प्रश्नांकडे त्वरित लक्ष देणे गरजेचे आहे. प्रणयराधन आनंददायी आणि खूपच उत्साहाचे ठरेल.

**तूळ** – शारीरिक सुदृढतेसाठी विशेषत: मानसिकदृष्ट्या कणखर बनण्यासाठी ध्यानधारणा आणि योगासने करा. आज तुम्ही मित्रांसोबत पार्टीमध्ये खूप पैसा खर्च करू शकतात परंतु, तरी ही तुमचा आर्थिक पक्ष आज मजबूत राहील. आपल्या जीवनसाथीच्या सहवासात आराम, मोकळेपणा आणि प्रेमाच्या अनुभूतीचा शोध घ्या.

**कुंभ** – चांगल्या गोष्टी घेण्यासाठी तुमचे मन सज्ज राहील. आपल्या पालकांनी केलेल्या मदतीमुळे आर्थिक अडचणींवर मात करणे शक्य होईल. तुम्ही तुमच्या घरची कर्तव्ये बजावण्याकडे दुर्लक्ष केले तर तुमचा जोडीदार वैतागून जाईल. गर्लफ्रेंड तुम्हाला धोका देऊ शकते. तुमची कलात्मक आणि सर्जनशील क्षमता यामुळे तुम्ही कौतुकाचे धनी व्हाल.

**कर्क** – तुमची शारीरिक प्रकृती सुधारण्यासाठी समतोल आहार घ्या. आज तुमचे भाऊ बहीण तुमच्याकडून आर्थिक मदत मागू शकतात आणि त्यांच्या मदतीने तुम्ही स्वतः आर्थिक दबावात येऊ शकतात तथापि, स्थिती लवकरच सुधारेल. नातेवाईक, मित्रमंडळी आणि व्यवसायातील सहकारी यांच्याशी कोणताही व्यवहार करताना तुमचे हित सांभाळा.

**वृश्चिक** – दुसऱ्यांवर टीका करण्याच्या सवयीमुळे तुम्हालाही टीका सहन करावी लागेल. तुमची विनोदबुद्धी जागृत ठेवा आणि बचावात्मक पवित्रा घेऊ नका आणि तसे केले तर गुप्तपणे केल्या जाणाऱ्या तुमच्यावरील शेरेबाजीलाही तुम्ही निष्प्रभ करू शकाल. काही अटकळी आणि अनपेक्षित लाभांमुळे आर्थिक परिस्थिती सुधारू शकेल.

**मीन** – आज तुमची प्रकृती चांगली राहील. त्यामुळे तुम्हाला यश मिळेल. परंतु, तुमचे सामर्थ्य संपुष्टात येईल असे काही करण्याचे कटाक्षाने टाळा. तुमच्या भाऊ-बहिणींपैकी आज कुणी तुमच्याकडून उधार मागू शकतात. तुम्ही त्यांना पैसे उधार घ्यालच परंतु, यामुळे तुमची आर्थिक स्थिती खराब होऊ शकते.

# साताऱ्यातील एस.टी. फेऱ्या रद्द व उर्मट अधिकाऱ्यांच्या चौकशीसाठी शिवसैनिकांनी घेतले हाती मशाल

**सातारा :** रविवार दिनांक १८ ऑगस्ट रोजी महायुतीच्या राज्य शासनाकडून साताऱ्यात लाडकी बहिण लाभार्थी सन्मान सोहळा आयोजित केला. या निमित्त ग्रामीण भागातील महिलांना फक्त वाहन व्यवस्था करून सभा मंडपात आणले. कोणतीही पूर्व सुचना न देता एस. टी. महामंडळाने

अचानक सातारा जिल्ह्यातील ४०० पेक्षा जास्त एस टी गाड्यांच्या फेऱ्या रद्द केल्या. याचा जाब विचारण्यासाठी सातारा जिल्हा प्रमुख सचिन मोहिते यांच्या नेतृत्वाखाली शिवसैनिकांनी हाती मशाल घेतली आहे. जर या उर्मट अधिकाऱ्यावर कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिलेला आहे. सातारा जिल्हयातील नागरीकांचे वेळापत्रक कोलमडल्यानंतर एस.टी. बस स्थानकात एकच गोंधळ निर्माण झाला. मुंबई- पुणे सारख्या ठिकाणावरून गावाकडे जाणाऱ्या व गावाकडून जिल्हा अथवा तालुक्याच्या ठिकाणी येवून काम करणारे प्रवासी, रुग्ण, विद्यार्थी व दुसऱ्या दिवशी रक्षाबंधन साठी खरेदीसाठी येणारे महिला व नागरिक यांची प्रचंड गैरसोय झाली. एका बाजूला घोषणाचा पाऊस पाडत आहे. आणि दुसऱ्या बाजूला प्रचंड महागाई वाढ होत आहे. महिलांचा अपमान करून त्यांची मानहानी केली जात आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. गोरगरिब जनतेला एस.टी. बस सेवा फार महत्वाची

असल्याने नागरीक या सेवेवर बहुतांशी अवलंबून असतात. एस टी महामंडळाने कोणतीही पूर्व सुचना न देता सातारा बस स्थानकातील अचानकपणे अनेक एस.टी. बस रद्द झाल्याने गोंधळ निर्माण झाला. याचा लोकशाही मार्गाने जाब विचारण्यासाठी शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन मोहिते व काही पत्रकार सातारा बस आगारात गेलो असता एका उर्मट अधिकाऱ्याकडून एस टी महामंडळाची बदनामी झालेली आहे. याचे व्हिडीओ उपलब्ध आहेत. तसेच प्रवासी यांच्याशी सुध्दा अत्यंत उर्मटपणे वागण्यात आले आहे. एका पत्रकाराचा मोबाईल हिसकावून घेतला. अनेकांशी अर्वाच्छ भाषेत बोलण्यात आले. मुळातच प्रवाशांच्या सेवेसाठी असलेल्या या एस.टी. महामंडळाची बदनामी संबंधित उर्मट अधिकारी यांच्याकडून झालेली आहे. या सर्व प्रकाराची चौकशी करण्यात येवून कोणाच्या आदेशाने पुर्व सुचना न देता. वरील प्रकार घडला आहे. तसेच जनतेशी व पत्रकाराशी उर्मटपणे वागणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्वरीत कारवाई करण्यात यावी. यासाठी त्याच दिवशी सातारच्या जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी व जिल्हा पोलीस अधीक्षक समीर शेख यांना तातडीने कळविण्यात आलेले आहे. त्यांनी कारवाईचे वचन दिले असले तरी सामान्य माणसाची नळ असणाऱ्या शिवसेना (उबाठा गट)वतीने येत्या २७ ऑगस्ट रोजी सातारा बसस्थानक परिसरात तीव्र निदर्शने करण्यास येतील. यामूळे कोणतेही शासकिय नुकसान झाल्यास याला या कृत्याला पाठीशी घालणारे सातारा जिल्हा प्रशासन जबाबदार असेल. असे निवेदनात नमूद केले असून निवेदनाची प्रत सातारचे निवासी उपजिल्हाधिकारी श्री नागेश पाटील यांना देण्यात आलेले आहे.



# 'लाडकी बहीण' बाबत माजी राज्यमंत्र्यांची मोठी मागणी. म्हणाले...!

**पुणे :** विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर महिला वर्गाला खुश करण्यासाठी राज्यात सत्ताधारी असलेल्या एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस-अजित पवार सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली आहे. या योजनेला महिला वर्गाकडून मोठा प्रतिसाद मिळत असून राज्यातील विविध जिल्ह्यांमध्ये याचे मोठे कार्यक्रम घेण्यासाठी लाखो रुपये खर्च केले जात आहेत.



राज्य सरकारने सुरू केलेली दरमहा पंधराशे रुपये मदतीची लाडकी बहीण योजना सध्या केवळ विशिष्ट उत्पन्न गटासाठीच लागू आहे. योजना लागू करताना लाडकी आणि सावत्र असा भेदभाव असता कामा नये. त्यामुळे ही योजना राज्यातल्या सर्वच महिलांना सरसकट लागू करावी अशी मागणी केली जात आहे. राज्य सरकारने सुरू केलेली ही योजना अल्प उत्पन्न गटातील महिलांपुरतीच मर्यादित असल्याचे या योजनेतील अटी आणि शर्ती वरून लक्षात येत आहे. ठराविक घटकातील महिलांनाच याचा फायदा व्हावा या हेतूनेच ही योजना राज्य सरकारने सुरू केली असल्याचे जाणवते.

काही मर्यादित संख्येतील महिलाच या योजनेला पात्र ठरत आहेत. कनिष्ठ मध्यमवर्गीय गटातील महिला यातून अपात्र ठरतात. अशा बहिणींना देखील शासनाने मदतीचा हात देण्याची गरज आहे. संजय गांधी योजनेतील लाभार्थ्यांनाही या योजनेचा लाभ देण्याची गरज आहे. कारण या योजनेतून त्यांना मिळणारी मदत तुटपुंजी आहे. महिला वर्गाला मदत द्यायचीच तर त्यात भेदभाव असता कामा नये, त्यामुळे लाडकी बहीण योजना सर्वांनाच लागू करावी अशी आग्रही मागणी माजी राज्यमंत्री आणि काँग्रेसचे नेते बाळासाहेब शिवरकर यांनी केली आहे. महिला वर्गाला मदत द्यायचीच तर त्यात भेदभाव करता कामा नये. सर्व बहिणींवर एकाच प्रमाणात शासनाचे प्रेम असणे गरजेचे आहे. अमुक एखादी बहीण लाडकी आणि दुसरी बहीण सावत्र हा दुजाभाव करणे अन्यायकारक आहे. जो भाजप देशातील तमाम नागरिकांना प्रत्येकी १५ लाख रुपये देण्यास तयार होता. त्या भाजपला आणि त्यांच्या पाठिंब्यावर तयार झालेल्या महाराष्ट्रातील सरकारला राज्यातल्या सर्व महिलांना सरसकट १५०० रुपयांची मदत देणे अजिबात अवघड नाही, असा टोला शिवरकर यांनी लगावला आहे. आपल्या प्रस्तावाचा सरकारने आवर्जून विचार करावा अशी आग्रही मागणीही त्यांनी केली आहे.

# 'मंकीपॉक्स'वर वर्षभरात लस?




**पुणे :** मंकीपॉक्स आजाराची रुग्णसंख्या वाढत असल्याने जगभरात चिंता व्यक्त केली जात आहे. पुण्यातील सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाने मंकीपॉक्सवरील स्वदेशी लसीची निर्मिती करण्यात येत असल्याचे जाहीर केले आहे.

आफ्रिकेतील बाराहून अधिक देशांमध्ये मुले आणि प्रौढांना मंकीपॉक्सची लागण झाली आहे. तसेच या विषाणूचा नवा प्रकार मोठ्या प्रमाणात पसरत आहे. या आजारावरील लसींचा पुरवठा कमी आहे. या परिस्थितीबाबत जागतिक आरोग्य संघटनेने (डब्ल्यूएचओ) चिंता व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदर पूनावाला यांनी प्रसिद्धिपत्रकाद्वारे मंकीपॉक्सवरील लसीबाबतची माहिती दिली. मंकीपॉक्समुळे धोक्यात आलेल्या लाखो लोकांसाठी सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया या आजारावरील लसीसंदर्भात काम करत आहे. सध्याची प्रगती पाहता येत्या वर्षभरात सकारात्मक निष्कर्ष हाती येण्याची आशा आहे, असे पूनावाला यांनी नमूद केले.

# नंदुरबार जिल्ह्यात बिबट्याच्या हल्ल्यात नातवासह आजीचा मृत्यू



**नंदुरबार :** बिबट्याच्या हल्ल्यात आठ वर्षाच्या नातवासह ५० वर्षाच्या आजीचा मृत्यू झाला. नंदुरबारच्या तळोदा तालुक्यातील काजीपूर शिवारात ही घटना घडली. आठवडाभरात नंदुरबार जिल्ह्यात बिबट्याच्या हल्ल्यात तिसरा मृत्यू झाल्याने परिसरात भीती निर्माण झाली असून वन विभागाने बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. तळोदा तालुक्यातील काजीपूर शिवारात अतुल सूर्यवंशी यांच्या शेतात भगदरी येथील कुटूंब रखवालदार म्हणून आहे. नेहमीप्रमाणे साखराबाई तडवी (५०) या मंगळवारी दुपारी बकऱ्या चारण्यासाठी गेल्या होत्या. बराच उशीर झाल्यावरही साखराबाई घरी परतल्या नाहीत. यामुळे साखराबाई यांची मुलगी बोकाबाई आणि सात वर्षांचा नातू श्रावण तडवी हे साखराबाईच्या शोधात सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास शेताकडे गेले. श्रावण आणि त्याची आत्या बोकाबाई हे शेताच्या बांधाने चालत असतांना बिबट्याने श्रावणवर हल्ला केला. त्याला लगतच्या ऊसाच्या शेतात फरफटत नेले. बोकाबाईने आरडाओरड केली. परंतु, बिबट्या श्रावणला घेवून पसार झाला होता. लगतच्या शेतात काम करत असलेल्या मजुरांना बोकाबाईने सर्व प्रकार सांगितला. भ्रमणध्वनीव्दारे साखराबाईचे कुटूंबिय आणि ग्रामस्थांना याबाबत माहिती देण्यात आली. ग्रामस्थांनी शोध घेतला असता साखराबाईचे शिर आणि छातीचा अर्धा भाग नष्ट केलेले शरीर आढळून आले. साखराबाईवर बिबट्याने दुपारी हल्ला केल्याचा अंदाज वन विभागाने वर्तविला आहे. श्रावणचाही मृतदेह सापडला. त्याच्या मानेवर व डोक्यावर खोलवर जखमा झाल्यामुळे आणि रक्तस्त्राव झाल्याचे आढळून आले. वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. वनक्षेत्रपाल स्वप्नील भामरे, वनपाल व्ही. एस. पाटील, वनरक्षक संजय तडवी, जाल्या पाडवी, विरसिंग पावरा, संदीप भंडारी, मोंजेश बिरळकर यांनी घटनेचा पंचनामा केला.

# Motorists on Pune-Solapur highway allege extortion at defunct toll plazas of Kavadi Pat, Kasurdi.

**Pune** - Motorists have demanded the National Highways Authority of India (NHAI) to act against the illegal levying of 'user fee' from the now-defunct toll plazas at Kavadi Pat and Kasurdi road on the Pune-Solapur highway.




They alleged some people have been misusing the toll booths, which were shut down in 2019, at night to target drivers from outside Maharashtra.

Pune-based RTI activist Vivek Velankar who is the president of Sajjan Nagarik Manch argued that a temporary shutdown should not last more than five years as miscreants are taking advantage of the situation, especially during nights. He also said that the defunct booths are creating a nuisance for drivers by causing congestion, including the speed breakers near them.

"How long will they remain 'temporarily' closed? They can be rebuilt later. But for now, they should be removed as they are becoming obstacles on the highway," he said.

However, NHAI denied the claims of extortion and said there is a possibility of resuming the operation of the toll plazas and hence they cannot be removed.

"We also need to verify whether the complaints being filed are genuine or false, as no one should have an issue with the toll booth infrastructure. Some local shop owners and hotels may have their own concerns, which they are trying to address through false complaints," added Abhijeet Aute, Manager Technical, NHAI (Pune).

Aute explained that the toll booths were shut down when they fell under the jurisdiction of the National Highway Public Works Department (NHPWD). "The toll booths have been closed for more than five years, but this is not permanent due to some pending proposed work. They will be reopened in a few years with the same infrastructure," he said.

Dayanand Vibhute, Superintendent Engineer at NHPWD, attributed the reason behind the shutdown of the toll booths to the completion of the concession period of the Build-Operate-Transfer (BOT) project.

# जागतिक छायाचित्रदिनानिमित्त अलिबाग फोटोग्राफर असोसिएशनच्या वतीने ज्येष्ठ छायाचित्रकारांचा सन्मान



**अलिबाग-** अलिबाग फोटोग्राफर असोसिएशन ही संस्था ज्येष्ठ छायाचित्रकारांचे योगदान लक्षात घेऊन दरवर्षी त्यांचा सन्मान करीत असते. गेले सहा वर्ष हा उपक्रम असोसिएशन राबवत आहे त्याचप्रमाणे यावर्षी ही जागतिक छायाचित्रदिनानिमित्त सदानंद पाटील (वाघ्रण), सुरेश खडपे (चौल), रवींद्र घरत (चौल) या ज्येष्ठ छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी जेष्ठ फोटोग्राफरने आपले अनुभव सांगितले व असोसिएशनचे त्यांनी कौतुक केले व असोसिएशन सामाजिक कार्य ही करत असते या प्रसंगी रायगड फोटोग्राफर्स आणि व्हिडिओग्राफर असोसिएशनचे उपाध्यक्ष समीर मालोदे, खजिनदार जितेंद्र मेहता, अलिबाग फोटोग्राफर्स असोसिएशन अध्यक्ष तुषार थळे, सचिव विकास पाटील, खजिनदार विवेक पाटील, अतुल वर्तक, विजय पाटील, अमर मढवी, योगेश सावंत, मच्छिंद्र दवंडे, गणेश जाधव, निलेश दुदम, रविराज पाटील, विराज घरत हे उपस्थित होते.

# PRTC employees allege misbehavior by toll employees, block traffic on Zirakpur-Patiala highway




**New Delhi -** Some of the protesting PRTC employees said that they have asked the toll plaza staff to reserve one lane for the buses as the bus operators have a time crunch.

The employees of Punjab Road Transport Corporation (PRTC) jammed the traffic at Azeejpur toll plaza on Zirakpur-Patiala highway on Wednesday, alleging misbehave by the toll employees. Hundreds of commuters faced problems after entry at the toll plaza was blocked by parking the buses.

The protestors allege that on due to a long queue of vehicles on Wednesday morning, the buses were stranded at the toll, and when the toll staff was confronted, they attacked a bus driver. Some of the protesting PRTC employees said that they have asked the toll plaza staff to reserve one lane for the buses as the bus operators have a time crunch.

# More trouble for Gurgaon's Chintels Paradiso: Seventh tower declared unsafe for occupancy

**Delhi -** A recent report from the Central Building Research Institute stated that Tower C in Gurgaon's Chintels Paradiso residential society is unsafe for habitation due to rapid corrosion caused by high levels of chlorides and significant carbonation.




Tower C is the seventh tower to be declared uninhabitable in the nine-towered Chintels Paradiso. "In view of the high chloride content in the structure and owing to the large number of failures of structural elements considering corrosion (obtained in the structural analysis and design results as per IS Standards), the safe demolition of TOWER C is advisable considering the human safety, feasibility/ durability of retrofitting/ repairs, uneconomical retrofitting, and recurring maintenance cost," the audit report stated. In February 2022, a portion of a sixth-floor apartment in Tower D collapsed to the first floor, killing two women and injuring a man. Following this, Deputy Commissioner Nishant Kumar Yadav ordered the evacuation of six towers —D, E, F, G, H and recently J— of the residential complex, all of which were declared unfit for habitation owing to several structural flaws, over the last two years.

# एसटीची चाके पुन्हा थांबणार? मुख्यमंत्र्यांसोबतची बैठक रद्द झाल्याने कर्मचारी...

● नागपूर, (प्रतिनिधी) :

**एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी राज्यातील १३ कामगार संघटनांनी एकत्र येत महाराष्ट्र एस. टी. कामगार संयुक्त कृती समितीच्या नेतृत्वात लढा उभारला आहे. या समितीसोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २० ऑगस्टला मुंबईत बैठक आयोजित केली होती. ही बैठक स्थगित झाल्याने एसटी कर्मचारी संतापले आहेत.**



राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी कर्मचाऱ्यांचेही वेतन करा, अशी मागणी कर्मचाऱ्यांकडून होत आहे. यासाठी १३ संघटनांनी एकत्र येत लढा उभारला आहे. या आंदोलनाची दखल घेत सरकारने कृती समितीसोबत चर्चा सुरू केली. आर्थिक व इतर प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्रिसदस्यीय समितीही गठित केली. ही चर्चा सुरू असतानाच मुख्यमंत्र्यांसोबत २० ऑगस्टला बैठक घेण्याचे ठरले. परंतु, लाडकी बहीण योजनेमुळे व्यस्ततेचे कारण पुढे करत मंगळवारी होणारी बैठक स्थगित करण्यात आली. त्यामुळे कृती समितीला महामंडळासोबतच बैठकीचे सोपस्कार आटोपावे लागले. बैठक स्थगित झाल्याने कामगारांनी समाजमाध्यमांवर संताप व्यक्त केला.

मुख्यमंत्र्यांची बैठक स्थगित झाल्याने कृती समितीनेही नाराजी व्यक्त केली. या नाराजीतून येत्या विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर एसटी कामगारांचे आंदोलन पुन्हा होणार असल्याचे संकेत मिळत आहेत. या विषयावर एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर यांची प्रतिक्रिया मिळवण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळाला नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यस्ततेमुळे २० ऑगस्टची बैठक स्थगित केली. लवकरच नव्याने बैठक घेऊन कामगारांना न्याय द्यावा. अन्यथा, ३ सप्टेंबरपासून राज्यात आंदोलन केले जाईल. – संदीप शिंदे, अध्यक्ष, महाराष्ट्र एस.टी. कामगार संघटना. एसटी कर्मचाऱ्यांच्या मागण्या काय?

राज्य शासनाच्या कर्मचाऱ्यांप्रमाणे एसटी महामंडळातील कामगारांना वेतन द्यावे, कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग देण्याबरोबरच मागील वेतन वाढीतील फरक दूर करावा, महागाई भत्त्याची थकबाकीची रक्कम द्यावी, मागील करारातील त्रुटी दूर करावी, याबरोबरच शिस्त व आवेदन पद्धतीमध्ये बदल करावा, मेडिकल कॅशलेस योजना सर्व कर्मचाऱ्यांना लागू करावी.

## एसटी महामंडळाबाबत

एसटी महामंडळाकडून प्रवासी वाहतुकीसाठी राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या व महत्वाच्या ठिकाणी २४७ आगारे व ५७८ बसस्थानकांमार्फत वाहतूक सेवा दिली जाते. प्रवासी सेवेची गुणवत्ता वाढविण्यासाठी महामंडळाने अभिनव योजना अंमलात आणल्या असून प्रामुख्याने बसेसच्या रचनेत व रंगसंगातील बदल करण्यात आलेला आहे. २ बाय २ आसन व्यवस्थेसह परिवर्तन बसेस, अधिक आरामदायी आसनव्यवस्थेसह निमआराम बसेस महामंडळाने पुरविलेल्या आहेत. सोबत आणखी नवीन इलेक्ट्रिकसह इतरही बसेस उपलब्ध केली जात असल्याचे एसटी महामंडळाच्या संकेतस्थळावर नमूद आहे.

# प्रकल्पबाधितांसाठी यापुढे घरांचे वितरण ऑनलाईन! दोन लाख घरांचे शासनाकडून लक्ष्य

● मुंबई, (प्रतिनिधी) :

मुंबईसह महानगर परिसरात मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांची कामे सुरू असून त्यामुळे विस्थापित होणाऱ्या प्रकल्पबाधितांसाठी तातडीने ५० हजार घरांची गरज आहे. तसेच भविष्यात ही गरज सव्वादोन लाख घरांची आहे. त्यामुळे शासनाने प्रकल्पबाधितांसाठी घरनिर्मिती व वितरणाबाबत नवे धोरण जाहीर केले आहे. या धोरणानुसार प्रकल्पबाधितांसाठी सव्वादोन लाख घरांचे लक्ष्य निश्चित करण्यात आले आहे. याशिवाय घर वितरणातील दलालांचा वावर कमी करण्यासाठी संपूर्ण यंत्रणा ऑनलाईन करण्यात आली आहे.

मुंबई महानगर परिसरात सुरू असलेल्या विविध पायाभूत प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या रहिवाशांची विहित मुदतीत पर्यायी व्यवस्था करण्यात आली नसल्याचा मुद्दा एका याचिकेद्वारे उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आला होता. याबाबत तातडीने कारवाई करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने नोव्हेंबर २०२३ मध्ये दिले होते. त्यानंतर राज्य शासनाने अलाहाबाद न्यायालयाच्या सेवानिवृत्त मुख्य न्यायधीशांच्या अध्यक्षतेखाली कृती दलाची स्थापना केली होती.



# कर्नाक पुलासाठी मेगाब्लॉकची प्रतीक्षा, तुळई तयार असूनही पूल रखडणार

● मुंबई, (प्रतिनिधी) :

सीएसएमटी आणि मशीद बंदर या दोन स्थानकांदरम्यान असलेल्या सुमारे दीडशे वर्षे जुन्या कर्नाक पुलाचे काम आधीच रखडलेले असताना आता या पुलाची तुळई बसवण्यासाठी रेल्वेच्या मेगाब्लॉकची प्रतीक्षा आहे. जोडकाम करून या पुलाची एका तुळई तयार आहे. मात्र पावसाळ्यात रेल्वेकडून मेगाब्लॉक मिळत नसल्यामुळे तुळई बसवण्याच्या कामाला वेळ लागणार आहे. दोन्ही तुळई बसवून हा पूल वाहतुकीसाठी थेट पुढच्या वर्षाअखेरीस खुला होऊ शकणार आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.



मशीद बंदर स्थानक आणि सीएसएमटी या दोन स्थानकांदरम्यान असलेला कर्नाक पूल धोकादायक बनल्यामुळे काही वर्षांपूर्वी वाहतुकीसाठी बंद करण्यात आला होता. त्यानंतर हा पूल नोव्हेंबर २०२२ मध्ये पाडण्यात आला.

या पुलाच्या बांधकामाला २०२३ मध्ये सुरूवात करण्यात आली. पुलाच्या तुळईचे सुटे भाग गेल्या महिन्यात मुंबईत आणण्यात आले. त्यानंतर या तुळईची जोडणी पूर्ण झाली असून रेल्वेमार्गाच्या पूर्व दिशेला तुळई बांधून तयार आहे. ही तुळई रेल्वे मार्गांवर बसवण्यासाठी पालिका प्रशासनाने रेल्वेकडे मेगाब्लॉकची मागणी केली आहे. मात्र रेल्वे प्रशासनाने अद्याप पालिका प्रशासनाला ब्लॉक दिलेला नाही.

पालिका प्रशासनाने सहा तासाच्या ब्लॉकची मागणी केली असून दिवसा हा ब्लॉक देण्याची मागणी केल्याची माहिती सूत्रांनी दिली. मात्र पावसाळ्यात या कामासाठी रेल्वेकडून ब्लॉक दिला जात नाही.

त्यामुळे पावसाळा संपण्याची वाट पाहावी लागणार असून तुळई बसवण्याचे काम ऑक्टोबरमध्येच होण्याची शक्यता आहे. या पुलाच्या कामासाठी ५३ कोटी खर्च करण्यात येत असून पाच वर्षांपूर्वीच या कामाला मंजुरी देण्यात आली आहे. प्रत्यक्षात अनेक अडथळयांमुळे काम उशीरा सुरू झाले. त्यामुळे या परिसरात नागरिकांना वळसा घालून जावे लागत आहे.

## पूर्ण अधांतरी तुळई

तुळई बसवण्यासाठी रेल्वे रुळांलगत खांब पूर्णत: अधांतरी (कॅण्टीलिवर) हा पूल पूर्वेकडून पश्चिमेकडे सरकवण्यात येईल. हे काम अत्यंत जोखमीचे असल्यामुळे पावसाळ्यानंतरच हा ब्लॉक मिळेल. ७० मीटर लांब आणि ९.५ मीटर रुंद अशा या तुळईचे वजन सुमारे ५५० मेट्रीक टन आहे. त्यानंतर दुसरी तुळई जोडली जाईल. दुसरी तुळई बसवण्याचे काम मार्च २०२५ मध्ये पूर्ण करण्याचे उद्दीष्ट्य ठेवण्यात आले आहे.

# बदलापूर रेल्वे स्थानकावरील आंदोलन पूर्वनियोजित; पोलिसांची माहिती



● बदलापूर, (प्रतिनिधी) :

बदलापूरमध्ये नागरिकांचा उद्रेक पाहायला मिळाला. दोन चिमुकल्या मुलींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या विरोधात हजारो नागरिक आंदोलनासाठी उतरले. नागरिकांचा एक गट आदर्श शिक्षण संस्थेच्या शाळेच्या आवारात आंदोलन करत होता. तर एका गटाने रेल्वेस्थानकात घुसून रेल्वेवाहतूक तब्बल १० तास रोखून ठेवली. पोलीस प्रशासन आणि सरकारतर्फे हे आंदोलन थांबविण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. मात्र अखेर सायंकाळी सौम्य लाठीचार्ज करून आंदोलकांना पांगण्यात आले. आता पोलिसांनी हे आंदोलन पूर्वनियोजित असल्याचे सांगितले आहे. एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने सांगितले की, आंदोलकांकडे जे छापील फलक होते, तसेच इतर काही वस्तू आणल्या गेल्या होत्या.

## रक्षाबंधनमुळे आंदोलन मंगळवारी केले

इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या बातमीनुसार पोलिसांनी सांगितले की, छापील फलक, व्हॉट्सॲप ग्रुपवरील मेसेज आणि इतर काही संकेतावरून हे आंदोलन पूर्वनियोजित असल्याचे समजते. लैंगिक अत्याचार प्रकरणात एफआयआर दाखल झाल्यानंतर सोमवारीच हे आंदोलन करण्याचा काही राजकीय पक्षांचा प्रयत्न होता. मात्र सोमवारी रक्षाबंधन असल्यामुळे आंदोलन मंगळावारी करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# गुगल मॅपवर जाणारा ट्रक उक्षी घाटात अडकल्याने वाहतूक खोळंबली



● रत्नागिरी , (प्रतिनिधी) :


गुगल मॅपचा आधार घेत मुंबई – गोवा महामार्गावरून निवळी मार्गे उक्षी घाटातून जाणारा ट्रक अडकल्याने वाहतूक खोळंबली. सुदैवाने ट्रक चालकाने प्रसंगावधान राखत ब्रेक लावल्याने ४०० फूट खोल दरीत कोसळून दुर्घटना होता होता टळली. ही घटना सोमवारी १९ऑगस्टला सायंकाळी उशिरा घडली. मुंबई गोवा महामार्गावरून (आर जे १४ जियो१३१५) ट्रक मुंबईच्या दिशेने जात होता. निवळी येथे आल्यानंतर त्याने गुगल मॅपचा आधार घेतला. उक्षी घाटातून जाताना एका अवघड वळणावर तो फसला. यामुळे दोन्ही बाजूला वाहतूक खोळंबली होती. मात्र येथील ग्रामस्थांना याची माहिती मिळताच त्यांनी आजूबाजूची झाडी तोडून मार्ग मोकळा केला.

# गणेशोत्सवाच्या सजावटीसाठी गड, किल्ले, मंदिरांच्या प्रतिकृतींना परदेशात पसंती

● मुंबई, (प्रतिनिधी) :

पर्यावरणस्नेही पुठ्ठयांपासून तयार करण्यात येणाऱ्या मखरांना या वर्षी मागणी वाढली आहे. पुठ्ठयांपासून तयार केलेल्या मखरांना मुंबईसह कोकण आणि परराज्यातील बडोदे, बंगळुरू, चेन्नई, केरळ, गोवा आदी विविध राज्यांतून पसंती मिळत असून दुबई, अमेरिका, लंडन, मॉरिशस, चीन आदी देशांतूनही या मखरांना मागणी वाढू लागली आहे.

गणेशोत्सवानिमित्त साकारण्यात येणारे मखर आणि सजावटीसाठी मोठ्या प्रमाणावर थर्माकोलचा वापर करण्यात येत होता. परंतु शासनाने थर्माकोलवर बंदी घातल्यानंतर मखर आणि सजावटीसाठी पर्यावरणस्नेही साहित्याचा वापर वाढला. दरवर्षीप्रमाणे यंदाही 'उत्सवी' संस्थेतर्फे गणेशोत्सवानिमित्त पुठ्यापासून सुवर्ण मखर, सूर्य मंदिर, गणेश महल, झोपाळा,



वनराई, नवरंग, मुंबईतील सिद्धिविनायक मंदिराचा गाभारा, कोकणातील उतरत्या छपराचे मंदिर, गड – किल्ल्यांच्या प्रतिकृती तयार करण्यात आल्या आहेत. पर्यावरणपूरक असणारे हे मखर घरगुती आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या गणेशमूर्तींसाठीही उपलब्ध आहेत. गणेशमूर्तींच्या उंचीनुसार मखरांची निर्मिती केली जाते. घरगुती मखरांचे दर हे १५० रुपयांपासून ५ हजारांपर्यंत आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठीचे मखर हे ३ हजार ५०० रुपयांपासून ३५ हजार रुपयांपर्यंत बाजारात उपलब्ध आहे. पुठ्ठयांपासून नक्षीदार सजावटींचा पर्याय उपलब्ध करून पर्यावरणपूरक मखर बनविण्यास सुरुवात केली. दीर्घकाळ टिकणाऱ्या मखरांमुळे पर्यावरणाचा ऱ्हास टाळणे शक्य आहे. मुंबई आणि परिसरात सुमारे दोन लाख घरगुती आणि १२ हजार सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आहेत. विसर्जनानंतर मोठ्या प्रमाणावर थर्माकोलचा कचरा जमा होत होता. हा कचरा नदी – नाले, वापरात नसलेल्या विहिरी तसेच इमारतींमधील अरुंद गल्ल्यांमध्ये टाकण्यात येत होता. त्यामुळे पर्यावरणाची हानी होत होती. परंतु आता सरकारने बंदी घातल्यामुळे थर्माकोलसारखे अविघटनकारी पदार्थांचा वापर टाळण्यात येत आहे.

# शिक्षक भरतीची कार्यपद्धती बदलणार?

● पुणे, (प्रतिनिधी) :

राज्य शासनाच्या शालेय शिक्षण विभागामार्फत राबवल्या जाणाऱ्या शिक्षक भरतीच्या कार्यपद्धतीतील त्रुटी दूर करून बदल शिक्षक भरतीच्या प्रक्रियेत सुधारणा करण्यासाठी अभ्यासगट स्थापन करण्यात आला असून, शिक्षकांना स्वतःच्या जिल्ह्यात नोकरीची संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने बदल करण्यासाठी हालचाली सुरू झालेल्या आहेत. सद्य:स्थितीत राज्यातील शिक्षक भरती शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणीमध्ये मिळालेल्या गुणांच्या आधारे केंद्रीय पद्धतीने पवित्र संकेतस्थळाद्वारे राबवली जाते. त्याद्वारे स्थानिक स्वराज्य संस्था, खासगी अनुदानित शाळांना शिक्षक उपलब्ध करून दिले जातात. शिक्षक पदभरतीनंतर शिक्षकांना वर्षानुवर्ष स्वतःचा जिल्हा सोडून अन्य जिल्ह्यात काम करावे लागते. त्यामुळे आंतरजिल्हा बदलीची मागणी शिक्षकांकडून केली जाते. बदली झाल्यानंतर नवीन जिल्ह्यात शुन्य सेवाजेष्ठतेवर शिक्षकांना यावे लागते. शिक्षकांना स्वतःच्या जिल्ह्यात नोकरीची संधी देणे आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना स्वतःच्या भागातील परिसरातील शिक्षक उपलब्ध होऊन शिक्षक अधिक क्षमतेने काम करतील, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यामध्ये शिक्षकांची मदत होईल, असे नमूद करून प्रचलित शिक्षक भरतीमधील त्रुटी दूर करुन जिल्हा, विभाग स्तरावर शिक्षक भरती प्रक्रियेबाबतचा अभ्यास करून कार्यपद्धती सुचवण्यासाठी शिक्षण आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली अभ्यासगट नियुक्तीचा शासन निर्णय प्रसिद्ध करण्यात आला.





# फुगवटा ओसरणार कधी?

● पुणे, (प्रतिनिधी) :

दर वर्षी दहावीच्या निकालानंतर अकरावीची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया सुरू होते. यंदाही ही सुरू झाली. मात्र गेल्या काही वर्षांत सातत्याने अकरावी प्रवेशाकडे असलेला विद्यार्थ्यांचा कल बदलल्याचे दिसून येत आहे. नियमित परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थी, पुरवणी परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रवेश देऊनही अकरावीच्या जागा मोठ्या प्रमाणात रिक्त राहत असल्याचे वारंवार दिसून आले आहे. अकरावीच्या जागांचा फुगवटा ओसरणार कधी, असा प्रश्न आहे.


यंदा पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील ३४३ कनिष्ठ महाविद्यालयातील १ लाख २० हजार ६४५ जागा प्रवेशासाठी उपलब्ध आहेत. त्यातील १७ हजार २८७ कोट्याअंतर्गत प्रवेशांसाठी, तर १ लाख ३ हजार ३५८ जागा केंद्रीभूत प्रवेशांसाठी आहेत. आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या आणि दोन विशेष फेऱ्यांतून ७२ हजारांवर प्रवेश झाले आहेत. तर ४८ हजारांहून अधिक जागा रिक्त राहिल्या आहेत. अद्याप पुरवणी परीक्षेचा निकाल जाहीर व्हायचा आहे. या परीक्षेतील उत्तीर्ण विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रियेत भर पडणार आहे. त्यामुळे ४८ हजारांतील काही जागा भरल्या जातील. मात्र गेल्या काही वर्षांतील अनुभव पाहता यंदाही जागा रिक्त राहणार आहेत.

शाळेचे वातावरण महाविद्यालयात नसते. महाविद्यालयीन आयुष्य म्हणजे मोकळेढाकळे वातावरण. त्यामुळे नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे प्राधान्य असायचे. प्रवेशासाठी चुरस व्हायची. मात्र अभियांत्रिकी, वैद्यकीय अशा अभ्यासक्रमांकडे जाणारे विद्यार्थी अकरावीला प्रवेश घेण्यापूर्वीच खासगी शिकवणी वर्गात प्रवेश घेतात. त्यामुळे 'इंटिग्रेटेड शिकवणी' प्रकाराने अकरावी प्रवेशाचे रुपडेच पालटले आहे. या शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांचा अकरावीचा महाविद्यालयातील प्रवेश नावापुरता असतो. कला शाखेकडे विद्यार्थ्यांचा ओढा कमी झाला आहे. उपनगरांमध्ये महाविद्यालयांची संख्या वाढली आहे. काही महाविद्यालयांना गेल्या काही वर्षांत तुकडीवाढ देऊन जागा वाढवून दिल्या गेल्या आहेत. परिणामी अकरावीच्या जागा वाढल्या आहेत, की त्या भरण्यासाठी विद्यार्थी पुरेसेच ठरत नाहीत. काही महाविद्यालयांमध्ये तर एक आकडी प्रवेश होतात. काही ठिकाणी तर प्रवेशच होत नाहीत. गेल्या काही वर्षांचा आढावा घेतला असता अकरावीच्या सरासरी तीस हजार जागा रिक्त राहतात. सिस्कॉम या संस्थेने केलेल्या अभ्यासानुसार कोट्यातील जागा, व्यवसाय अभ्यासक्रमांच्या जागा भरल्या जात नाहीत, ३० ते ३५ टक्के महाविद्यालयात शून्य आणि २० टक्क्यांपेक्षा कमी प्रवेश, जेमतेम १० टक्के महाविद्यालयात १०० टक्के प्रवेश झाल्याचे नमूद केले आहे. दर वर्षी जागा रिक्त राहत असूनही त्यात नव्या जागांची भर पडते. त्यामुळे अकरावी प्रवेशाच्या जागांना आधीच आलेली सूज आणखी वाढत आहे.

# मनसे अध्यक्ष राज ठाकरे आजपासून विदर्भ दौऱ्यावर

## मराठवाड्यानंतर आता विदर्भ पिंजून काढणार

● मुंबई, (प्रतिनिधी) :



आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मनसे पक्ष देखील मैदानात उतरला असून त्या अनुषंगाने राज्यभरात जोरदार तयारी करत आहे. मनसे आगामी विधानसभा निवडणूक ही स्वबळावर लढवणार आहे. या पार्श्वभूमीवर मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे महाराष्ट्र दौरा करत आहेत. नुकताच मराठवाडा दौरा राज ठाकरे यांनी केलाय. यानंतर आता मनसे अध्यक्ष विदर्भ आजपासून विदर्भ दौरा करणार आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे सर्वेसर्वा राज ठाकरे हे प्रत्यक्ष मैदानात उतरून पदाधिकारी आणि निरीक्षकांच्या बैठका घेऊन विधानसभेसाठी चाचपणी करणार आहेत. त्यामुळे विधानसभेसाठी विदर्भात मनसे शड्डू ठोकणार का? याकडे आता सऱ्यांचे लक्ष लागले आहे. मनसेच्या विदर्भ दौऱ्यानिमित्त विदर्भातील काही जागांवर मनसेचे उमेदवार घोषित होण्याची शक्यता आहे. विदर्भातील ज्या विधानसभा जागांवर सक्षम आणि त्या भागात ताकद असलेला उमेदवार दौऱ्यानिमित्ताने राज ठाकरे घोषित करणार अशी माहिती पुढे आली आहे. मागील मराठवाडा दौऱ्या दरम्यान राज ठाकरे यांनी राज्यातील चार जागांवर आपले उमेदवार घोषित केले होते.